महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २५४ वे | दिनांक : १०/०९/२०२६ | वार : गुरूवार

## पार्थ पवारांना आरोपी का केले नाही? : १८०० कोटींच्या मुंढवा जमीन गैरव्यवहारात हायकोर्टाचा पोलिसांना थेट सवाल



**मुंबई** : पुण्यातील बहुचर्चित आणि तब्बल 1800 कोटी रुपयांच्या मुंढवा जमीन खरेदी प्रकरणात आता एक अत्यंत मोठी घडामोड समोर आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा खासदार पार्थ पवार यांना या प्रकरणात अद्याप आरोपी का करण्यात आले नाही? असा थेट सवाल मुंबई उच्च न्यायालयाने पोलिसांना विचारला आहे. तसेच, याप्रकरणी राज्याचे पोलीस महासंचालक आणि तपास अधिकाऱ्यांनी उत्तर द्यावे, असे स्पष्ट आदेशही न्यायालयाने दिले आहेत. उच्च न्यायालयाच्या या दणक्यामुळे पार्थ पवार यांच्या अडचणीत मोठी वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरणी दाखल याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती माधव जामदार यांच्या एकलपीठासमोर सुनावणी पार पडली. यावेळी हायकोर्टाने पोलिसांच्या तपासावर ताशेरे ओढले. या प्रकरणात पार्थ पवार यांच्यावर गुन्हा का दाखल करण्यात आला नाही आणि त्यांना का आरोपी केले नाही, अशी विचारणा करत न्यायालयाने पोलिसांना धारेवर धरले. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता 28 सप्टेंबरला होणार असून, पोलीस काय उत्तर देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

या संपूर्ण प्रकरणाच्या चौकशीसाठी विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीने आपला 4 हजार 392 पानांचा जंबो अहवाल नुकताच विधिमंडळात सादर केला आहे. समितीने एकूण 7 बैठका घेऊन हा अहवाल तयार केला आहे. या अहवालात कुणालाही स्पष्टपणे क्लीन चीट देण्यात आलेली नाही. अहवालात पार्थ पवार यांच्यावर थेट कारवाईचा उल्लेख नसला तरी, भविष्यात फौजदारी तपासात अधिक लोकांचा सहभाग आढळल्यास कारवाई होऊ शकते, असे नमूद करण्यात आले आहे. तसेच, शासकीय जमिनीचे नियमबाह्य हस्तांतरण करण्यासाठी दस्त नोंदवल्याची गंभीर बाब समोर आली असून, नोंदणी प्रक्रियेतील महसूल, मुद्रांक व नोंदणी अधिकाऱ्यांची चूक ठळकपणे मांडण्यात आली आहे. याप्रकरणी संबंधित तहसीलदार आणि दुय्यम निबंधकांवर बडतर्फीची शिफारस करण्यात आली आहे.

पुण्यातील कोरेगाव पार्क लगतच्या मुंढवा परिसरातील सुमारे 40 एकर जमिनीचा हा वाद आहे. ही जमीन 1819 मध्ये 'महार वतन' म्हणून देण्यात आली होती. त्यानंतर 1957 मध्ये ती सरकारजमा झाली आणि 1962 मध्ये भारतीय वनस्पती सर्वेक्षण केंद्राला भाडेतत्त्वावर देण्यात आली. यापैकी केवळ 3 एकरांवर कामकाज सुरू होते, तर उर्वरित जमीन जंगल स्वरूपात होती. मात्र, 2006 मध्ये वतनदारांकडून शीतल तेजवानी यांना 'पॉवर ऑफ अटर्नी' देण्यात आली आणि त्यानंतर ही जमीन पार्थ पवार यांच्या 'अमीडिया' कंपनीकडे हस्तांतरित करण्यात आली. सद्यस्थितीत या 40 एकर जमिनीचा बाजारभाव तब्बल 1800 कोटी रुपये सांगितला जातो. मात्र हा व्यवहार केवळ 300 कोटी रुपयांत दाखवण्यात आला. याशिवाय, सुमारे 21 कोटी रुपयांचे मुद्रांक शुल्कही माफ करण्यात आल्याने या व्यवहारावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## संघाच्या कार्यालयावरील मोर्चा सरकार सहन करणार नाही : बावनकुळे



**मुंबई** : काँग्रेस पक्षाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यालयावर मोर्चा काढण्याची भूमिका घेतल्यानंतर राज्याचे राजकारण चांगलेच तापले आहे. राज्याचे महसूल मंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी या मुद्द्यावरून काँग्रेसवर जोरदार पलटवार केला आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा राष्ट्र उभारणी आणि देशाच्या अखंडतेसाठी निस्वार्थपणे काम करणारी संघटना आहे. अशा संघाच्या कार्यालयावर मोर्चा काढणे सरकार कदापि सहन करणार नाही. जर काँग्रेसच्या नेत्यांमध्ये खरोखरच हिंमत असेल, तर त्यांनी भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयावर मोर्चा काढून दाखवावा, असे थेट आव्हान मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहे.

मुंबईत पत्रकारांशी संवाद साधताना बावनकुळे यांनी काँग्रेसच्या या आंदोलनाच्या रणनीतीवर कडाडून टीका केली. लोकशाहीत विरोधकांना आंदोलन करण्याचा पूर्ण अधिकार आहे, मात्र तो कुठे करावा याचे भान काँग्रेसने ठेवले पाहिजे, असा टोला त्यांनी लगावला. ते म्हणाले की, "जर काँग्रेसला सरकारविरोधात आंदोलन करायचे असेल, तर त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस आयुक्त कार्यालय, जिल्ह्यांचे पालकमंत्री कार्यालय, मुख्यमंत्री कार्यालय किंवा नागपुरातील मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान असलेल्या रामगिरीवर मोर्चे काढावेत. तिथे आंदोलन करण्यास आमची कोणतीही हरकत नाही. मात्र, केवळ राजकीय द्वेषापोटी संघाच्या कार्यालयावर मोर्चा काढणे कोणत्याही परिस्थितीत मान्य केले जाणार नाही आणि खपवूनही घेतले जाणार नाही."

बावनकुळे यांनी 'वंदे मातरम्'च्या मुद्द्यावरूनही काँग्रेस पक्षाला चांगलेच धारेवर धरले. "वंदे मातरम् हे केवळ एक गीत नसून ती भारताची संस्कृती, संस्कार आणि आपला वैभवशाली वारसा जगभरात मजबूत करणारी आपली अस्मिता आहे. या गीताचा जाणीवपूर्वक अपमान करणे म्हणजे सोनिया गांधी, राहुल गांधी आणि त्यांच्या संपूर्ण काँग्रेस पक्षाकडून देशाचा अपमान करण्यासारखे आहे," असा गंभीर आरोप बावनकुळे यांनी केला. तसेच, भारतात जर राहायचे असेल तर प्रत्येक नागरिकाला 'वंदे मातरम्' म्हणावेच लागेल, अशी अत्यंत आक्रमक भूमिकाही त्यांनी यावेळी मांडली. काँग्रेसच्या या देशविरोधी भूमिकेचा जाब देशातील जनता आगामी 2029 च्या निवडणुकीत नक्कीच विचारेल, असा इशाराही त्यांनी दिला.

बावनकुळे यांनी राज्याच्या चिंतेचा विषय असलेल्या शेती आणि पावसाच्या परिस्थितीवरही भाष्य केले. राज्यात यंदा पावसाची मोठी तूट निर्माण झाली आहे. मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्रासह राज्याच्या अनेक भागांत सरासरीच्या तुलनेत केवळ 65 टक्के पाऊस झाला असून तब्बल 35 टक्के पावसाची तूट आहे. या अस्मानी संकटामुळे शेतकऱ्यांची मुख्य पिके असलेले सोयाबीन, कापूस यांसह इतर खरीप पिके अडचणीत आली आहेत. त्यामुळे राज्यातील बळीराजासमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले असून शेतकऱ्यांमध्ये निराशेचे वातावरण आहे. मात्र, अशा अत्यंत कठीण आणि कसोटीच्या काळातही शेतकऱ्यांनी धीर सोडू नये आणि कोणत्याही परिस्थितीत आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलू नये, असे भावनिक आवाहन मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले आहे. राज्य सरकार पूर्णपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून लवकरच यातून मार्ग काढला जाईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## केवळ पदवी नव्हे, तर विद्यार्थ्यांना उद्योगांच्या गरजांनुसार सक्षम करा - मंत्री चंद्रकांत पाटलांचे आदेश

**मुंबई** : महाराष्ट्रातील अभियांत्रिकी आणि पॉलिटेक्निक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राज्य सरकारने एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. राज्यातील तरुण विद्यार्थ्यांची कौशल्य क्षमता, रोजगार मिळवण्याची क्षमता आणि उद्योगसज्जता वाढवण्यासाठी आता उद्योगाभिमुख प्रशिक्षण, केंद्रीकृत प्लेसमेंट सुविधा आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित विशेष कौशल्यविकास उपक्रम राबवण्यावर शासनाकडून मोठा भर दिला जाणार आहे. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या एका महत्त्वपूर्ण आढावा बैठकीत याविषयीचे सविस्तर नियोजन करण्यात आले.

या बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांना आणि शैक्षणिक संस्थांना स्पष्ट निर्देश देताना मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, "महाराष्ट्रातील युवकांना बदलत्या उद्योगविश्वाच्या आणि बाजाराच्या गरजांनुसार सक्षम करण्यासाठी केवळ पारंपरिक शिक्षण पुरेसे नाही. शिक्षण, उद्योग आणि तंत्रज्ञान क्षेत्राचा समन्वय अधिक प्रभावीपणे साधणे आता काळाची गरज बनली आहे. विद्यार्थ्यांना केवळ पदवी किंवा पदविका (डिप्लोमा) देणे हा आपल्या शिक्षणाचा अंतिम उद्देश असू शकत नाही. तर, त्यांना खऱ्या अर्थाने रोजगारक्षम, उद्योगसज्ज आणि भविष्यातील तंत्रज्ञानाच्या आव्हानांना धैर्याने सामोरे जाण्यासाठी सक्षम करणे गरजेचे आहे." यासाठी अभ्यासक्रम, प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष उद्योगानुभव यांची योग्य सांगड घालण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

या आढावा बैठकीत इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन (ISTE) च्या माध्यमातून राबवण्यात येणाऱ्या विविध कौशल्यविकास उपक्रमांचे सविस्तर सादरीकरण करण्यात आले. यामध्ये भविष्यातील रोजगाराच्या दृष्टीने तीन प्रमुख उपक्रमांचा समावेश करण्यात आला आहे:

१.ISTE Centralized Placement Platform: या आधुनिक मंचाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना रोजगार, इंटर्नशिप आणि अप्रेंटिसशिपच्या संधी एकाच छताखाली उपलब्ध करून दिल्या जातील. यामुळे उद्योग आणि शैक्षणिक संस्थांमध्ये प्रभावी समन्वय साधला जाईल.

२.Centre for Future Skills: भविष्यातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाशी संबंधित अद्ययावत प्रशिक्षण विद्यार्थ्यांना या केंद्राच्या माध्यमातून दिले जाईल.

३.ISTE-SmartBridge AI Skilling Initiative: आजच्या काळाची गरज ओळखून विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) क्षेत्रातील प्राथमिक ते प्रगत स्तरावरील कौशल्य प्रशिक्षण देण्यासाठी हा विशेष उपक्रम राबवला जाईल.

कौशल्यविकासाच्या या सर्व अत्याधुनिक उपक्रमांची केवळ कागदावर चर्चा न राहता, त्यांची प्रत्यक्ष आणि प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी स्पष्ट, परिणामाभिमुख आणि कालबद्ध रोडमॅप तयार करण्याचे ठोस निर्देश मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले आहेत. 'शिक्षणातून कौशल्य, कौशल्यातून रोजगार आणि रोजगारातून सक्षम भविष्य' या दिशेने विद्यार्थ्यांना पुढे नेण्याचे शासनाचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या उच्चस्तरीय बैठकीला उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, तंत्रशिक्षण संचालक डॉ. प्रमोद नाईक, इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीचे (ICT) कुलगुरू प्रा. अनिरुद्ध पंडित, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू रविंद्र कुलकर्णी, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि AICTE चे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. सरकारच्या या नव्या धोरणामुळे राज्यातील लाखो तरुण विद्यार्थ्यांच्या भवितव्याला एक नवी आणि सकारात्मक दिशा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १० सप्टेंबर २०२६


## 'अक्षर अक्षर तुझेच आहे'च्या मंचावर कलाकारांचा गौरव; मराठवाडा आर्टिस्ट क्लबच्या वतीने सन्मान सोहळा




**छत्रपती संभाजीनगर :** मराठी कवितेच्या शब्दांना स्वरांची साथ, भावनांना संगीताची किनार आणि रसिकांच्या उत्स्फूर्त दादेने 'अक्षर अक्षर तुझेच आहे' या स्वरचित मराठी कवितांच्या सांगीतिक मैफलीचा बहारदार प्रयोग तापडिया रंगमंदिरात पार पडला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने मराठवाडा आर्टिस्ट क्लबच्या वतीने कला क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या कलाकारांचा विशेष सन्मान करण्यात आला.मराठवाडा आर्टिस्ट क्लबचे अध्यक्ष साहिल इनामदार यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाचा उद्देश मराठवाड्यातील नवोदित तसेच कार्यरत कलाकारांना प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या कलेला योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा आहे.माननीय ACP सागर देशमुख (Crime Department, छत्रपती संभाजीनगर) यांच्या हस्ते अपूर्व राजपूत, अविनाश काठवटे, नैनेश तांबे, सारंग पांपटवार, शुभम गोरे आणि संगीतकार राग यांना त्यांच्या कला क्षेत्रातील अमूल्य योगदानाबद्दल गौरवपूर्वक सन्मानचिन्ह प्रदान करून सन्मानित करण्यात आले.'अक्षर अक्षर तुझेच आहे' या मैफलीत कवी अपूर्व राजपूत, अविनाश काठवटे, सारंग पांपटवार आणि नैनेश तांबे यांनी आपल्या स्वरचित कविता, गाणी आणि गझलांचे सादरीकरण करत रसिकांना शब्द, सूर आणि भावनांच्या सुंदर विश्वाची अनुभूती दिली. प्रेम, विरह, जगणं, नातेसंबंध, सामाजिक वास्तव, भक्ती आणि माणूसपण अशा विविध विषयांवरील कविता आणि गझलांनी सभागृह भारावून गेले.मराठी कवितेला केंद्रस्थानी ठेवून केलेले विविध सृजनशील प्रयोग हे या मैफलीचे विशेष आकर्षण ठरले. कविता ही केवळ वाचण्याची किंवा ऐकण्याची गोष्ट नसून ती जगण्याचा अनुभव आहे, याची जाणीव या कार्यक्रमातून प्रकर्षाने झाली. कवितेच्या माध्यमातून रसिक आणि कवी यांच्यात निर्माण झालेला जिव्हाळ्याचा संवाद हा कार्यक्रमाचा विशेष ठरला.या कार्यक्रमाचे संयोजक काला गेंदा क्लबचे शुभम गोरे तसेच कवन टीमचे आदित्य जाधव यांचेही विशेष योगदान राहिले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संपूर्ण टीमने परिश्रम घेतले.यावेळी मराठवाडा आर्टिस्ट क्लबचे सदस्य तुषार पल्लाळ, मुबश्शिर नाईक, जावाद पठाण, गौरी आहेर, सय्यद तुबा आणि झहीर खान उपस्थित होते. क्लबचे अध्यक्ष साहिल इनामदार यांनी सूत्रसंचालनाची जबाबदारी सांभाळली.रसिक प्रेक्षकांच्या उपस्थितीत आणि टाळ्यांच्या कडकडाटात हा सन्मान सोहळा तसेच सांगीतिक मैफल उत्साहात पार पडली. मराठवाड्यातील कला-कारांच्या कलेचा गौरव करण्यासोबतच नवोदित कलाकारांना प्रोत्साहन देण्याच्या दिशेने मराठवाडा आर्टिस्ट क्लबचा हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे.

'अक्षर अक्षर तुझेच आहे' या मैफलीला रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मराठी कवितेच्या या आगळ्यावेगळ्या प्रयोगाचे कौतुक केले. शब्दांना सूर आणि भावनांना आवाज देणाऱ्या या मैफलीने संभाजीनगरच्या रसिकांच्या मनावर अविस्मरणीय ठसा उमटवला.

## रामपुरीत शेतकरी महिलेच्या घरात धाडसी चोरी; १० लाख ३६ लाखांचा ऐवज लंपास



**दौलताबाद (जावेद अहमद) :** रामपुरी तालुका जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथील शेतकरी महिलेच्या घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा तब्बल १० लाख ३६ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना मंगळवारी (दि. ९) पहाटे उघडकीस आली. याप्रकरणी दौलताबाद पोलिस ठाण्यात चोरीची तक्रार दाखल करण्यात आली आहे.याबाबत दुर्गा सोमिनाथ भराड (वय ५०, व्यवसाय शेती, रा. भराड वस्ती, रामपुरी, ता. छत्रपती संभाजी नगर) यांनी पोलिसांत तक्रार दिली आहे. भराड कुटुंबीय शेतीसोबत दुग्ध व्यवसायही करतात. त्यांची फत्तियाबाद शिवारातील शेतगट क्रमांक १२० मध्ये सुमारे १२ एकर शेती असून, शेतातच त्यांचे घर आहे.सोमवारी (दि. ८) रात्री दहाच्या सुमारास कुटुंबातील सर्वजण जेवण करून घरात झोपले होते. मंगळवारी पहाटे साडेचारच्या सुमारास त्यांची सून सुवर्णा देवणाथ भराड उठली. घराबाहेर येऊन पाहिले असता घराचे कुलूप तुटलेले व दरवाजा उघडा असल्याचे तिच्या निदर्शनास आले. तिने कुटुंबीयांना उठवून प्रकार सांगितला.कुटुंबीयांनी घराची पाहणी केली असता घरातील उडव्या वस्तू अस्ताव्यस्त पडलेल्या होत्या. लोखंडी पेटीचे कुलूप तोडून त्यातील सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरीला गेल्याचे आढळले. घरातील दोन लोखंडी पेट्या चोरट्यांनी शेतातील अंजीराच्या बागेच्या कोपऱ्यात नेऊन त्यांचे कडी-कोयंडे तोडून उघड्या अवस्थेत टाकून दिल्या होत्या.चोरट्यांनी सोन्याचे गंठण, नेकलेस, बांगड्या, ठुशी आदी दागिने तसेच चांदीचे दागिने आणि ४ लाख रुपये रोख असा एकूण १० लाख ३६ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला.घटनेची माहिती मिळताच दौलताबाद पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली. तसेच श्वान पथक,फॉरेन्सिक लॅब पथक,गुन्हा शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक व पथक घटनास्थळी जाऊन पाहणी केली आहेअज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू करण्यात आला आहे.

## जिंतुर- येलदरी-सेनगाव मंजूर रस्त्याच्या ऐवजी जिंतुर- येलदरी- सावळी-इटोली- पोखर्णी- पाचेगाव असा रस्ता करावा



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** जिंतूर तालुक्यातील वरील रस्ता मा ना सौ मेघना साकोरे बोर्डीकर राज्य मंत्री तथा पालकमंत्री यांच्या प्रयत्नातून मंजूर झाला असून याबद्दल नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण असून सर्वत्र परिसरामध्ये आनंदाचे वातावरण आहे मात्र सदरील मंजूर रस्त्या ऐवजी जिंतूर- येलदरी- सावळी- इटोली- पोखर्णी- पाचेगाव असा हा रस्ता करण्यात यावा या साठी पंचायत समिती सदस्या सौ रंजना बालाजी सांगळे यांनी असंख्य कार्यकर्त्यांसह मा. आमदार रामप्रसाद वामनराव बोर्डीकर व राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री सौ मेघना साकोरे बोर्डीकर यांना निवेदन देऊन मागणी केली आहे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १० सप्टेंबर २०२६


## बंजारा समाजाच्या मागण्यांवर शासनाने आता ठोस निर्णय घ्यावा



**जिंतूर (बी.डी.रामपूरकर) :** बंजारा समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी मागील वर्षभरापासून सुरू असलेल्या संघर्षाला आता गंभीर वळण आले आहे. बंजारा समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी श्री. विनोद आडे मागील पाच दिवसांपासून आमरण उपोषणास बसले असून, त्यांच्या प्रकृतीची दिवसेंदिवस होत असलेली घसरण ही प्रशासनासाठी चिंतेची बाब आहे.या पार्श्वभूमीवर सकल बंजारा समाजाच्या वतीने तहसीलदार, तहसील कार्यालय जिंतूर यांना दिनांक ९ सप्टेंबर २०२६ रोजी निवेदन देण्यात आले आहे. निवेदनावर तहसील कार्यालयाची आवक-जावक नोंद झाल्याचे नमूद करण्यात आले आहे.उपोषणकर्त्यांच्या प्रकृतीची नियमित वैद्यकीय तपासणी, आवश्यक उपचार आणि प्रशासनाकडून तातडीचा संवाद या बाबींना सर्वोच्च प्राधान्य मिळणे आवश्यक आहे. आंदोलन कितीही तीव्र असले तरी त्यामागील प्रश्नांकडे दुर्लक्ष करणे हा कोणत्याही लोकशाही व्यवस्थेला शोभणारा मार्ग नाही. मागण्यांवर केवळ आश्वासन नको, निर्णय हवाबंजारा समाजाने शासनासमोर आदिवासी समाजाप्रमाणे लागू असलेल्या सवलती व हक्कांबाबत सकारात्मक निर्णय, शासनाने स्थापन केलेल्या समितीचा अहवाल सार्वजनिक करणे, समाजासाठी बलिदान देणाऱ्या व्यक्तींच्या कुटुंबीयांना मदत, जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राच्या अडचणी दूर करणे, ऐतिहासिक दस्तऐवज व हैदराबाद गॅझेटच्या आधारे स्पष्ट भूमिका जाहीर करणे, विद्यार्थ्यांसाठी शिक्षण व रोजगाराच्या संधी वाढविणे, तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांसाठी घरकुल, जमीन व रोजगाराच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी अशा विविध मागण्या मांडल्या आहेत.याशिवाय मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बंजारा समाजाच्या शिष्टमंडळाची तातडीने बैठक घेऊन मागण्यांवर चर्चा करावी, अशीही प्रमुख मागणी आहे.१२ सप्टेंबरची मुदत; प्रशासनासमोर आता कसोटीनिवेदनात १२ सप्टेंबरपर्यंत संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत शासनस्तरावर निवेदन सादर करून मुख्यमंत्री व समाजाच्या शिष्टमंडळाची बैठक आयोजित करण्याची मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे येणारे काही दिवस प्रशासनासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहेत.लोकशाही व्यवस्थेत आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करण्याऐवजी त्यांच्याशी संवाद साधणे, वस्तुस्थिती समजून घेणे आणि कायदेशीर चौकटीत शक्य असलेल्या मागण्यांवर निर्णय घेणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. विशेषतः आमरण उपोषणाचा पाचवा दिवस असल्याने मानवी दृष्टिकोनातून प्रशासनाने तातडीने पुढाकार घेणे आवश्यक आहे.संपादकीय भूमिकाबंजारा समाजाच्या मागण्या योग्य आहेत किंवा नाहीत, याचा अंतिम निर्णय शासन व संबंधित तज्ज्ञ यंत्रणांनी कायदा, उपलब्ध ऐतिहासिक नोंदी आणि घटनात्मक तरतुदींच्या आधारे घ्यावा. मात्र, मागण्यांकडे दीर्घकाळ दुर्लक्ष करून आंदोलन अधिक चिघळू देणे हा निश्चितच योग्य मार्ग नाही.एका उपोषणकर्त्याची प्रकृती गंभीर होण्याची वाट पाहण्यापेक्षा प्रशासनाने आजच संवादाचे दार उघडले पाहिजे. तहसील प्रशासनाने जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांशी समन्वय साधून शासनाकडे तातडीने अहवाल पाठवावा. त्याचबरोबर उपोषणकर्ते श्री. विनोद आडे यांच्या प्रकृतीची वैद्यकीय तपासणी व आवश्यक उपचारांची व्यवस्था सुनिश्चित करावी.शासनानेही बंजारा समाजाच्या मागण्यांबाबत ठोस, अधिकृत आणि पारदर्शक भूमिका समाजासमोर मांडणे गरजेचे आहे. आश्वासनांच्या पलीकडे जाऊन कोणत्या मागण्यांवर काय निर्णय घेता येईल, कोणत्या मागण्यांसाठी केंद्र किंवा राज्यस्तरीय प्रक्रिया आवश्यक आहे आणि कोणत्या मागण्यांवर कालमर्यादित कार्यवाही केली जाणार आहे, हे स्पष्ट झाले पाहिजे.आंदोलन चिघळणे हा कोणाच्याही हिताचा मार्ग नाही. संवाद, कायदेशीर प्रक्रिया आणि ठोस निर्णय हाच लोकशाहीचा मार्ग आहे.आम्हाला संघर्ष नको न्याय हवा.आश्वासन नको ठोस निर्णय हवा.वेळकाढूपणा नको तातडीची कार्यवाही हवी.आता प्रशासन आणि शासनाने ही भूमिका कृतीतून सिद्ध करण्याची वेळ आली आहे.

## अनुसूचित जमाती प्रमाणपत्राच्या प्रश्नासाठी आदिवासी ठाकर समाजाची सहआयुक्तांशी भेट



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद,कन्नड, सोयगाव तालुक्यातील आदिवासी ठाकर समाजाच्या वतीने सह आयुक्त सौ प्रिती बोंद्रे व उपाध्यक्ष व संशोधन अधिकारी यांना फुलांचा गुच्छ आणी ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले अनुसूचित जमाती प्रमाणपत्राच्या प्रश्नाबाबत संबंधित सहआयुक्तांची भेट घेऊन विविध अडचणी व मागण्यांवर चर्चा करण्यात आली.यावेळी ठाकर समाजातील नागरिकांना, विद्यार्थ्यांना अनुसूचित जमाती प्रमाणपत्र मिळविताना येणाऱ्या अडचणी, कागदपत्रांची पूर्तता तसेच प्रमाणपत्र प्रक्रियेशी संबंधित विविध प्रश्न सहआयुक्तांच्या निदर्शनास आणून देण्यात आले. गौताळा आदिवासी ठाकर समाज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था छत्रपती संभाजीनगर चे अध्यक्ष पांडू कडाळे, अंबाला गावचे सरपंच सखाराम भुतांबरे आदिवासी क्रांतिकारक राया ठाकर फाउंडेशन महाराष्ट्र राज्य खुलताबाद शाखेचे तालुका अध्यक्ष सनिराम गावंडे मा सभापती खेमा मधे,यांनी आपले प्रश्न मांडत असताना सांगितले की, आदिवासी ठाकर समाज हा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद, कन्नड,सोयगाव या तालुक्यातच वास्तव करतो इतर तालुक्यात राहत नाही ठाकर समाजाच्या विद्यार्थ्यांना, शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र महत्त्वाचे आहे. त्यामुळे पात्र लाभार्थ्यांना अनावश्यक अडचणी येऊ नयेत,यासाठी आपल्या कार्यालयाने योग्य मार्गदर्शन व आवश्यक कार्यवाही करावी ठाकर समाजात घुसघोरीचे प्रमाण वाढत चालले आहेत ते थांबवण्यात यावे स्वतः ला आदिवासी ठाकर समजणारे बोगस ठाकरांना बाहेर काढावे, समाजातील पात्र नागरिकांना, विद्यार्थ्यांना शासनाच्या नियमांनुसार प्रमाणपत्र मिळण्यासाठी प्रक्रिया सुलभ व पारदर्शक करण्याची मागणी करण्यात आली.या प्रश्नांवर अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीचे सह आयुक्त सौ प्रिती बोंद्रे यांनी सांगितले की, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र हे शिक्षण, शासकीय नोकरी तसेच निवडणूक या शाखांनाच प्रमाणपत्र देण्यात येते, ठाकर समाजात होणा-या घुसखोरी ,बोगसांना आळा बसण्यासाठी प्रयत्न चालू आहेत आणि घुसखोरी होऊ देणार नाही असा शब्द ठाकर समाजाला दिला.सहआयुक्तांनी ठाकर समाजाचे म्हणणे ऐकून घेत संबंधित बाबींची नियमानुसार दखल घेण्याचे आश्वासन दिले.यावेळी आदिवासी ठाकर समाजाचे ,सुभाष उघडे, बाळू मेंगाळ, हौसाबाई आगिवले ,रोशनी मेंगाळ, सगुणा पोकळे,अंजनाबाई भुतंबरे, हौसाबाई उघडे,पुंजाबाई मेंगाळ, बुधाबाई मेंगाळ ,रंभाबाई मधे ग्राम पंचायत सदस्य सुंदराबाई शिध, गंगूबाई गावंडे, बाळाबाई उघडे साखराबाई पोकळे, शांताबाई पथवे, सिताबाई मेंगाळ चिवळी इत्यादी कार्यकर्ते व महिला कार्यकर्त्या उपस्थित होते.


### प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

### साहिल कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १० सप्टेंबर २०२६

## बैलपोळा

हर्षाचा उल्हासाचा
आज सण बैलपोळा
सर्जा-राजाचा
आनंदाचा सोहळा

मखमली झुलीचा साज
गळयात कवड्याच्या माळा
पायात घुंघराच्या वाळा
वाजती खळखळा

हिरवे-तांबडे बाशिंग
शोभती कपाळी
आज नुसता आराम
खाऊनी पुरणपोळी

त्याच्या अपार कष्टानं
पिकते काळी माती
बळीराजासोबत जपतो
माणूसकीची नाती

राब राब राबूनी
आयुष्याचं करतो सोनं
त्यावरी लळा लावूनी
चला जपूया पशूधन



**सौ. कल्पना चालीकवार**
महागाव, जि. यवतमाळ

## झाली पिकाची दैना

सुखाच्या दिवसाची,
वाट पाहते माझी मैना.
पाऊस दडी मारल्याने,
उभ्या पिकाची झाली दैना. १

पिकाच्या भरोशावर,
स्वप्न अनेक पाहिले.
पिकाची दैना होताच,
स्वप्न अधुरेच राहिले. २

नको होऊ निराश मैना,
संकटांशी सामना करू.
उजाडलेल्या जीवनात,
कष्ट करून सप्तरंग भरू. ३

संकटावर स्वार होऊन,
परिस्थितीवर करू मात.
चल लढण्यासाठी मैना,
पुन्हा हातात घालून हात. ४

संकटांशी लढणे आता,
माझ्या अंगवळणी पडले.
दडी मारल्याने पाऊस,
शेतात पीक उभ्याने जळले. ५

मायबाप सरकारने आता,
दुष्काळ जाहीर करावे.
शेतकऱ्यांच्या डोळ्यातले,
आसवे पुसून आनंद भरावे. ६



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

# आजीवन शिक्षणाच्या विस्तारित संधींचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा - प्राचार्य डॉ. विश्वास कदम




**(प्रतिनिधी) :** शिक्षण हे केवळ महाविद्यालयाच्या चार भिंतींपुरते मर्यादित न राहता समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. बदलत्या काळानुसार समाजाच्या गरजा ओळखून विविध उपक्रमांच्या माध्यमातून ज्ञानाचा प्रसार करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग करीत आहे. त्यामुळे या विभागाचे काम आता महाविद्यालयापुरते मर्यादित राहिले नसून समाजाभिमुख झाले आहे, आजीवन विभागाच्या शैक्षणिक कक्षा रुंदावल्या विद्यार्थ्यांनी या विभागाचा फायदा घ्यावा !असे प्रतिपादन श्री. शिवाजीराव पंडित महाविद्यालय गढी तथा शिवाजीनगर चे प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी केले.ते जयभवानी महाविद्यालयात आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाचे उद्धाटन सोहळ्यात उदघाटक म्हणुन बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून वसंतदादा पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बळिराम राख उपस्थित होते. प्रमुख म्हणुन म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे क्रिडा संचालक प्रा.डॉ.सचिन देशमुख व सरस्वती भूवन महाविद्यालयाचे क्रिडा प्रमुख प्रा.डॉ. डी.के.कांबळे हे होते.तर व्यासपीठावर प्रा.डॉ.भागचंद सानप आणि प्रा. डॉ. संतोष वनगुजरे,कनिष्ठ विभागाचे प्रा.प्रकाश नाईकवाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून विस्तार सेवा विभागाच्या समन्वयक तथा विद्यापीठाच्या सिनेट सदस्या प्रा. डॉ. कल्पना घारगे यांनी विभागाच्या उद्दिष्टांची व आगामी उपक्रमांची माहिती दिली.आजीवन शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसोबतच सर्वसामान्य नागरिक, महिला, युवक तसेच समाजातील विविध घटकांना कौशल्याधारित व उपयुक्त शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने विभागामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ.बळीराम राख यांनी सांगितले की आजिवन शिक्षण व विस्तार विभागातुन समाजाभिमूक उपक्रम राबवून आनेक युवकांना रोजगाराच्या संधी निर्माण करून दिल्या आहेत.प्रमुख वक्ते प्रा. डॉ.सचिन देशमुख यांनी विस्तार सेवा विभागाची भूमिका विशद करून विद्यार्थ्यांनी खेळाकडे व्यावसायीक दृष्टीकोणातून बघावे ! असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. शिवाजी काकडे यांनी केले. तर आभार क्रिडा विभाग प्रमुख प्रा. डॉ.प्रविण शिलेदार यांनी मानले. तर या उदघाटन सोहळ्याचे फेसबुक लाईव्ह थेट प्रेक्षपण नाटककार प्रा.बापू घोक्षे यांनी केले.

या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दर्शनासाठी आलेल्या भाविकाला दिवसाढवळ्या लुटले

**दौलताबाद (जावेद अहमद) :** दि ०७ सोमवारी दुपारी दोन वाजेच्या सुमारास सेवानिवृत्त कर्मचारी मधुकर सर्जेराव लोंढे हे एकादशी निमित्ताने दर्शनासाठी दौलताबाद येथे सकाळी आले होते दुपारी दोन वाजता दर्शन झाल्यानंतर घरी परत दुचाकी ने जात असताना दौलताबाद छत्रपती संभाजी नगर रस्त्यावर अब्दीमंडी मेट्रो हॉटेल जवळ एक अनोळखी इसम दुचाकी वरून आला व बाजूला थांबवून व विचारपूस करत आपण पोलीस असल्याने सांगितले व ओळखपत्र पण दाखवले व एका महिलेवर वार केलेले आहे त्यासाठी आमची पोलीस चेकिंग चालू आहे त्याचवेळी रस्त्यावर एक इसम उभा होता त्याने त्याला बोलवले त्याचा कडून रुमाल घेऊन त्याच्या कडील वस्तू रुमालात बांधून त्याचे कडे दिली व मधुकर यांना तुमच्या कडे असलेल्या वस्तू माझ्या कडे रुमालात दया असे सांगितले त्यावर मधुकर यांनी जवळ असलेले दोनशे रुपये व कागदपत्रे दिली चोरट्याने हातात असलेली सात ग्रामची २९००० रुपये किमतीची सोन्याची अंगठी पण काढून दया म्हणून रुमाल मध्ये बांधून घेतली व ते दोन्ही अनोळखी इसम दुचाकी वर बसून पळून गेले हाकेच्या अंतरावर पोलीस स्टेशन असून सुद्धा दिवसाढवळ्या वृध्दाला लुटण्याचा प्रकार घडला आहे अश्या घटना बरोबर चोरीच्या घटना वाढत असल्याने ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे पोलीस गस्त वाढवण्याची मागणी केली आहेया घटनेची तक्रार मधुकर लोंढे यांनी दौलताबाद पोलीस स्टेशनमध्ये दिली आहे

**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.**

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १० सप्टेंबर २०२६

# पर्युषण पर्व की दंडेली पर्व?

आपण आपल्या धार्मिक परंपरेनुसार कोणत्या अन्नाचे सेवन करावे आणि कोणत्या नाही,याचे पूर्ण स्वातंत्र्य देशाच्या संविधानाने प्रत्येकाला दिले आहे. तुम्ही तुमच्या अहिंसेच्या तत्त्वानुसार मांसाहार टाळू शकता; परंतु इतर धर्मीयांवर किंवा नागरिकांवर मांसाहार न करण्याची सक्ती करणे हा एकप्रकारे संविधानिक स्वातंत्र्याचा संकोच आहे.पर्युषण पर्वाच्या काळात इतरांना मांसाहार करण्यापासून रोखणे अथवा या काळात मांसविक्री आणि सेवनावर सरसकट बंदी घालणे हे कृत्य अन्नस्वातंत्र्याच्या विरोधात जाणारे आहे. प्रत्येकाने आपापल्या धार्मिक विचारांचे आणि नियमांचे आवर्जून पालन करावे.तुम्हाला मांसाहार करायचा नसेल तर जरूर करू नका,पण इतरांच्या आहार आणि व्यवसायाच्या स्वातंत्र्यावर गदा आणू नका.अन्यथा 'हे पर्युषण पर्व आहे की दंडेली पर्व?' असा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे.

**- पक्षीमित्र राजेंद्र गाडगीळ**

# छत्रपती संभाजीनगरमध्ये इंटिरिअर क्षेत्रात 'हाऊझ डेकोर'ची वेगळी ओळख

**छत्रपती संभाजीनगर :** नवीन डिझाईन्स, कुशल कारागीर आणि किफायतशीर दरांमुळे ग्राहकांचा वाढता प्रतिसादछत्रपती संभाजीनगर : घर असो वा कार्यालय, आपल्या जागेला आकर्षक आणि आधुनिक रूप देण्याकडे नागरिकांचा कल दिवसेंदिवस वाढत आहे. बदलत्या आवडीनिवडी आणि आधुनिक इंटिरिअर ट्रेंडनुसार ग्राहकांना विविध पर्याय उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने छत्रपती संभाजीनगरमध्ये *'हाऊझ डेकोर'*ने आपल्या कामाची सुरुवात केली आहे.जानेवारी २०२४ मध्ये आमेर हयात खान यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या हाऊझ डेकोरला इंटिरिअर क्षेत्रातील सुमारे ८ वर्षांचा अनुभव आहे. या अनुभवाच्या माध्यमातून ग्राहकांना आधुनिक डिझाईन, दर्जेदार साहित्य आणि विश्वासार्ह कामाचा अनुभव देण्यावर संस्थेचा भर आहे.इंटिरिअरच्या विविध गरजांसाठी एकाच ठिकाणी पर्यायघर, बंगला, फ्लॅट, कार्यालय, दुकान, क्लिनिक तसेच इतर व्यावसायिक जागांसाठी आवश्यक असलेल्या विविध इंटिरिअर उत्पादने आणि सेवांचा पर्याय हाऊझ डेकोरमध्ये उपलब्ध करून देण्यात आला आहे.भिंतींची सजावट, विविध प्रकारचे पॅनेल्स, लूव्हर्स, वॉलपेपर तसेच इतर आधुनिक इंटिरिअर सोल्युशन्सच्या माध्यमातून ग्राहकांना आपल्या जागेला त्यांच्या आवडीनुसार नवे रूप देता येते.नवीन उत्पादनांवर विशेष लक्षइंटिरिअर क्षेत्रात डिझाईन आणि उत्पादनांमध्ये सातत्याने बदल होत असतात. ग्राहकांना बाजारात उपलब्ध होणारी नवीन उत्पादने आणि आधुनिक डिझाईन्स इतरांपेक्षा लवकर उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न हाऊझ डेकोरकडून केला जातो.ग्राहकांच्या गरजा, जागेची रचना आणि उपलब्ध बजेट यांचा विचार करून योग्य पर्याय निवडण्यास मार्गदर्शन करण्यावरही भर दिला जातो.कुशल कारागीर आणि विश्वासार्ह कामइंटिरिअरमध्ये केवळ चांगले मटेरियल पुरेसे नसून त्याची अंमलबजावणीही तितकीच महत्त्वाची असते. त्यामुळे कुशल कारागिरांच्या माध्यमातून कामाची गुणवत्ता आणि फिनिशिंग राखण्याचा प्रयत्न हाऊझ डेकोरकडून केला जातो.विश्वासार्ह काम, योग्य मार्गदर्शन आणि ग्राहकांच्या अपेक्षांनुसार काम पूर्ण करण्याला संस्थेने प्राधान्य दिले आहे. त्याचबरोबर आधुनिक इंटिरिअर सर्वसामान्य ग्राहकांच्या बजेटमध्ये उपलब्ध करून देण्यासाठी किफायतशीर दरांवर दर्जेदार पर्याय देण्याचा प्रयत्न केला जात आहे.ग्राहकांच्या आवडीला केंद्रस्थानी ठेवण्याचा प्रयत्न"प्रत्येक ग्राहकाची गरज आणि पसंती वेगळी असते. त्यामुळे केवळ तयार पर्याय देण्याऐवजी ग्राहकाच्या जागेचा प्रकार, त्याची आवड आणि बजेट समजून घेऊन योग्य इंटिरिअर सोल्युशन देण्याचा आमचा प्रयत्न असतो. बाजारात येणारी नवीन उत्पादने ग्राहकांना लवकर उपलब्ध करून देणे, विश्वासार्ह काम आणि किफायतशीर दर ही आमची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत," असे हाऊझ डेकोरचे संस्थापक आमेर हयात खान यांनी सांगितले.डिजिटल माध्यमातूनही ग्राहकांशी संपर्कआजच्या डिजिटल युगात ग्राहकांना नवीन डिझाईन्स आणि उत्पादनांची माहिती सहज उपलब्ध व्हावी यासाठी हाऊझ डेकोर सोशल मीडियाचाही प्रभावी वापर करत आहे. @houzedecorr या इन्स्टाग्राम माध्यमातून इंटिरिअरशी संबंधित विविध कल्पना, उत्पादने आणि कामांची माहिती ग्राहकांपर्यंत पोहोचवली जाते.छत्रपती संभाजीनगरमध्ये इंटिरिअर क्षेत्रात वाढत असलेल्या मागणीच्या पार्श्वभूमीवर नवीन डिझाईन्स, विश्वासार्ह सेवा, कुशल मनुष्यबळ आणि किफायतशीर दर यांच्या माध्यमातून ग्राहकांना समाधानकारक इंटिरिअर सोल्युशन्स उपलब्ध करून देण्याचा हाऊझ डेकोरचा प्रयत्न आहे.

हाऊझ डेकोरपत्ता: शॉप नं. १, बेसमेंट, हयात कॉम्प्लेक्स, जिंसी चौक, छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र – ४३१००१
Instagram: @houzedecorr

# बालमनावर मूल्यसंस्कार रुजविणारे साहित्य असावे - संमेलनाध्यक्ष डॉ. विनोद सिनकर



**जालना :** वर्तमानातातील परिस्थिती पाहता बालमनावर आपण कोणते संस्कार करीत असतो,याचा गांभिर्याने विचार करायची वेळ आलेली आहे. समाज माध्यमे,मोबाईल सारख्या माध्यमांच्या अविवेकी वापराने समाजमन बदलत आहे. वास्तवात बालमन समृद्ध करणारे आणि मूल्यसंस्कार रुजविणारे साहित्यच प्रभावी ठरते,असे प्रतिपादन बालकुमार संमेलनाचे अध्यक्ष डॉ. विनोद सिनकर यांनी संमेलनात बोलताना केले.पद्मभूषण डॉ. बद्रीनारायण बारवाले विद्यालय मांडवा ( ता.बदनापूर) येथे स्व.दत्तात्रय हेलसकर स्मृतिदिनानिमित्त बालकुमार संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. संमेलनाध्यक्ष म्हणून बाल साहित्यिक डॉ. विनोद सिनकर हे होते. बालकुमार संमेलनाचे उदघाटन देवगिरी प्रांत साहित्य भारतीचे कार्याध्यक्ष तथा ज्येष्ठ पत्रकार उमेश काळे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या वेळी साने गुरुजी कथामालेचे प्रमुख कार्यवाह आर.आर.जोशी, संस्थाध्यक्ष किसनराव सोलाट, सचिव नंदाताई सोलाट, उपाध्यक्ष ज्ञानदेव चंद,मुख्याध्यापिका अंजली सोलाट, साने गुरुजी कथामालेचे जिल्हाध्यक्ष डॉ.सुहास सदाव्रते, साहित्य भारती जालना शाखेच्या अध्यक्षा शुभांगी लिंगायत, जगदीश कुडे, जवाहर तुल्ले यांची प्रमुख उपस्थिती होती.संमेलनाचे अध्यक्ष डॉ. विनोद सिनकर म्हणाले,की सभोवतालचे विश्व आणि सांस्कृतिक सामाजिक वातावरणात नकारात्मक सूर मोठ्या प्रमाणात दिसून येतो. अशा बदलाचा परिणाम बालमनावर होत असतो. समाजमन,पालकांचे विचार आणि परिस्थिती यासह सोशल मिडीयाच्या प्रभावात बालमन कोमेजून जात असल्याचे डॉ. सिनकर म्हणाले. अध्यक्षीय भाषणात 'पाऊस'आणि 'मुंगी'अशा बालकविता सादर करीत मुलांना मंत्रमुग्ध केले. बालसाहित्याचा विचार करता लेखक महावीर जोंधळे, ज्येष्ठ साहित्यिक सूर्यकांत सराफ यांच्या कार्याची प्रेरणा घेत आपण काम करीत असल्याचे डॉ. सिनकर म्हणाले.संमेलनाचे उदघाटक ज्येष्ठ पत्रकार तथा देवगिरी प्रांत साहित्य भारतीचे कार्याध्यक्ष श्री.उमेश काळे म्हणाले,की आज पालकाची मानसिकता मुले डॉक्टर इंजिनिअर व्हावेत असाच विचार करतात,परंतु मुलांना इतरही क्षेत्रातही करिअर करता येते,असे सांगून सहा वर्षाच्या एका मुलीने कथा लिहित गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड कसे केले,असा प्रेरणादायी विचार मुलांनी करावा,असा सल्लाही दिला. लेकराच्या भविष्यासाठी रमाबाई अशोक रणवीर या आईची मॅरेथॉनमध्ये धावण्याची जिद्द कशी मुलांसाठी प्रेरणादायी ठरते,अशी वास्तव घटना सांगून आईवडील मुलांचे नाते किती उत्कट प्रेमाचे असते,अशी शिकवण आज घराघरात द्यावी,असेही श्री.उमेश काळे यांनी सांगितले.बालकुमार संमेलनाचे प्रास्ताविक करताना साने गुरुजी कथामालेचे प्रमुख कार्यवाह आर.आर.जोशी यांनी सांगितले, की गेल्या ३२ वर्षांपासून साने गुरुजी कथामालेचे कार्य आणि स्व.दत्तात्रय हेलसकर यांच्या आठवणींना उजाळा दिला. मुलांनी मोबाईल पासून दूर जात पुस्तकाच्या विश्वात रमली पाहिजे,यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करावेत असेही आवाहन श्री.जोशी यांनी केले. सध्या घडत असलेल्या घटना,खूण मारामारी,भांडण तंटे अशा घटनांचा बालमनावर परिणाम होतो, यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज असल्याचे श्री.जोशी यांनी सांगितले. कार्यक्रमात पद्मभूषण डॉ. बद्रीनारायण बारवाले विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अंजली सोलाट यांनी भूमिका मांडली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुहास सदाव्रते यांनी केले. आभार संदीप इंगोले यांनी मानले..






# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १० सप्टेंबर २०२६


## मराठा आरक्षणात ओबीसी सारख्या सर्व सवलती द्या-राज्यस्तरीय बैठकीत जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांची मागणी



**नाशिक :** मराठा समाजाचे सर्व प्रश्न सरकारने सोडवावेत यात प्रामुख्याने आरक्षणाचा प्रश्न ऐरणी वर असुन ज्यांचे कडे पुरावे असतील, ज्यांच्या वंशावळी जुळतील त्यांची जात प्रमाणपत्रे आणि व्हॅलिडिटी द्यावी व न्याय द्यावा परंतु ज्यांचे कडे काही एक पुरावा नाही त्यांचे काय? असा घणाघात मराठा समाजाच्या वतीने उच्च न्यायालयातील मुख्य हस्तक्षेप याचीकाकर्ते जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी या बैठकीत समारोपाच्या मुख्य भाषणात केला असुन नमुद केले की, राज्य शासनाचे उच्च न्यायालयातील प्रकरणा कडे एकाग्रता ठेऊन कार्य सुरु नसुन सर्वोच्च न्यायालयातील क्यूरेटिव्ह पिटीशन मध्ये सुधारीत कायदेशीर व घटनात्मक तरतुद असलेल्या तरतुदीचे अर्ज दिला नाही तर तिथे सुद्धा आपण ही केस हरणार आहोत आणि अशीच स्थिती मुंबई उच्च न्यायालयात असुन सर्वोच्च न्यायालयाने मनाई केलेल्या मागण्या राज्य शासनाचे वतीने सतत केली जात असुन ही केस सुद्धा हातातून गेल्या सारखी स्थिती असुन आम्ही या साठी अंत्यन्त अभ्यासु असे सुधारीत कायदेशीर व घटनात्मक तरतुदीच्या विविध अशा ६० पेक्षा जास्त घटना पिठाचे निर्णय पान निहाय असलेले पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन असलेले सादरीकरण उपसमितीच्या बैठकीत मुख्यमंत्री यांनी स्वत: पहावे अशी नमुद करून त्यांनी मागणी केली की,ओबीसी सारख्या बालवाडी ते पदव्युत्तर शिक्षण वयाची व नोकरीत वयाची अट ओबीसी सारखी ठेवण्याची सवलती मराठा समाजाला देतांना राजकीय आरक्षण वगळता द्याव्यात जेणे करून ओबीसी-मराठा हा निर्माण झालेला वाद संपुष्टात येईल आणि "फुले शाहू आंबेडकर " यांचा महाराष्ट्र हे चित्र परत देश भरात जाईल.असे म्हणुन त्यांनी छत्रपती संभाजीनगर येथे दि ९ऑगस्ट ते २४ ऑगस्ट २०२६ दरम्यान केलेले अन्नत्याग आंदोलन उपोषणाची सविस्तर माहिती दिली व नमुद केले की हे उपोषण राज्य शासनाचे लक्ष वेधण्यासाठी होते आणि आमच्या उपोषणाची घोषणा झाली तो पर्यंत महाराष्ट्रात कोणतेही उपोषण होणार असल्याची घोषणा झालेली नव्हती म्हणुन हे उपोषण फक्त राज्य शासनाचे मराठा समाजाच्या मागण्या कडे लक्ष वेधण्या साठी होते न की कोणाच्या विरोधात होता. पुढे अधिक सविस्तर बोलतांना ते म्हणाले की, स्व आण्णा साहेब पाटील महामंडळास व्याज परतावा आणि पुढील कामा साठी १० हजार कोटी,सारथी च्या विद्यार्थी उपक्रमासाठी, परदेशी जाऊन उच्च शिक्षणासाठी अधिकच्या ३०० संस्थांनाच्या निवड करून पात्रता साठी ५५% गुण एवढी मर्यादा ठेऊन ५ हजार कोटींचा निधी द्यावा, आंदोलनातील सर्व गुन्हे तातडीने परत घ्यावेत, मराठा समाजातील तरुणांच्या प्रलंबित नियुक्त्या तात्काळ देऊन मार्ग मोकळा करतांना न्याय देण्याची भूमिका ठेवावी अशी व इतर प्रलंबित मागण्याची अपूर्ण असलेली पूर्तता करण्याची मागणी जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी या राज्य स्तरीय बैठकीच्या समारोपा च्या मार्गदर्शनात केली.उपस्थित राज्य भरातील मराठा समाजाला देण्यात आलेले एसईबीसी आरक्षण, सारथी संस्था,अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ याबाबतचे सर्वप्रश्न सरकारने सोडवावेत, अन्यथा राज्यव्यापी तीव्र आंदोलन छेडण्यातयेईल, असा इशारा देखील मराठा क्रांती मोर्चाने दिला आहे.नाशिकच्या कालिका माता मंदिर सभागृहात ८ ऑगस्ट मंगळवारी मराठासमाजाची राज्यस्तरीय बैठक झाली.क्रांती मोर्चाच्या समन्वयकां सह मराठा समाजाचे राज्यभरातील निमंत्रितयावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते या बैठकीनंतरमराठा क्रांती मोर्चाच्या समन्वयकां सहप्रतिनिधींनी पत्रकारांशी संवाद साधला.मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक या सह उच्च न्यायालयातील मराठा समाजाच्या वतीने असलेले मुख्य हस्तक्षेप याचीकाकर्ते जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांचे सह राजेंद्र कोंढरे,राजाभाऊ,शेटे,केशव अण्णा पाटील,दादासाहेबपाटील,हरिभाऊ बोडखे, विजय काकडे,संजय भोर, रविंद्र बनसोड, राजेंद्र चित्रे विलास पांगरकर,परमेश्वर नलावडे,प्रशांत इंगळे, प्रदीप बिल्लोरे आदींसह राज्य भरातील समाजबांधव मोठ्या संख्येने बैठकीला हजर होते.या बैठकीचे प्रस्तविक करण गायकर यांनी केले तर उपस्थितांचे आभार विलास पांगरकर यांनी केले तर सूत्रसंचालन गणेशराव जाधव यांनी केले. या राज्य स्तरीय बैठकीचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला.

## मनपा प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात शिक्षक दिन (स्वयंशासन दिन) उत्साहात साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** मनपा प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा शाळेत शिक्षक दिन (स्वयंशासन दिन) उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे व्यवस्थापन वर्ग दहावीच्या विद्यार्थ्यांनी केले होते. वर्ग पाचवी ते नववीच्या वर्गात दहावीच्या विद्यार्थ्यांनी अध्यापन अध्यापनाचे कार्य केले . कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक श्री राठोड सर होते. प्रमुख अतिथी चव्हाण सर होते. स्वयंशासन दिनाच्या मुख्याध्यापक कुमारी. समरीन शेख व उपमुख्याध्यापिका. मनीषा उबाळे, यांनी आपली जबाबदारी पार पाडली. याप्रसंगी विद्यार्थी शिक्षक म्हणून राधेशयाम गिरी, संतोष गिरी, कमलेश गायकवाड, यांनी शिकवण्याचे अनुभव मनोगतातून व्यक्त केले.

या कार्यक्रमासाठी श्री. वाघ सर , सूर्यवंशी सर, पठाण सर, श्रीमती. माळोदे मॅडम, रंधे मॅडम, भारद्वाज मॅडम,भिंगोले मॅडम, चव्हाण मॅडम, शिंदे मॅडम, फुलंब्री कर मॅडम, कवठेकर मॅडम व श्री. वाघ मामा, साबळे मावशी, भोसले मावशी, यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन कुमारी अस्मिता भारसाकळे हिने केले. तर आभार अश्विनी कुमार कांबळे याने केले.

## बैल पोळा

आला संस्कृतिचा सण
करूया बळीराजाचा सन्मान...

सजला नंदी आज
घेऊन गोंड्याचा साज...

नानाविध साजांनी सजेल नंदी माझा
परंपरेची धुरा राखेल बळीराजा....

वर्षभर देतो निस्वार्थ साथ
शेतकऱ्याचा वाली बळी राजाच
खास...

पुरणपोळीचा देऊ घास नंदीला
नारळाचा नेवेद्य वाहू देवाला...

वर्षभर राबतो शेतात
करावं आज त्याचा सन्मान...
बदलत्या काळात नं
विसरावे बळीराजाचे उपकार...



– कु गीता सुमन गणेश खरात
कायगाव ता. सिल्लोड
जि. छत्रपती संभाजीनगर


प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103

जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १० सप्टेंबर २०२६

## कौशल्याधारित अभ्यासक्रम आणि भारतीय ज्ञानपरंपरेचा शिक्षणात समन्वय आवश्यक - डॉ. सय्यद अझरुद्दीन



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील मल्टिपल एन्ट्री-मल्टिपल एक्झिट व्यवस्थेमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजेनुसार शिक्षणात प्रवेश घेण्याची, काही काळानंतर शिक्षणातून बाहेर पडण्याची आणि पुन्हा शिक्षणाशी जोडले जाण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे उच्च शिक्षण अधिक लवचिक आणि विद्यार्थी-केंद्रित होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन नांदेड येथील प्रा. डॉ. डी. एन. मोरे यांनी केले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर आणि श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०च्या अनुषंगाने आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत 'मल्टिपल एन्ट्री-मल्टिपल एक्झिट' या विषयावर मार्गदर्शन करताना ते बोलत होते.कार्यशाळेचे उद्धाटन भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. अमोल मोरे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी संस्थेचे सहसचिव डॉ. सुभाष वाघमोडे होते. यावेळी मा. पद्माकरराव हराळकर, प्राचार्य डॉ. संजय अस्वले व प्राचार्य डॉ. हरिदास फेरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यशाळेचे प्रस्ताविक प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी केले.यावेळी डॉ. सय्यद अझरुद्दीन यांनी 'एकात्मिक कौशल्याधारित अभ्यासक्रम, बहुविषयक अध्ययन आणि भारतीय ज्ञानपरंपरा' या विषयावर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना केवळ पदवी न देता रोजगारक्षम कौशल्ये, सर्जनशीलता आणि व्यापक दृष्टिकोन विकसित करणारे शिक्षण देणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षणाला भारतीय ज्ञानपरंपरेची जोड देतानाच बदलत्या काळातील कौशल्यांची सांगड घालणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात अधिष्ठाता एम. के. पाटील यांनी 'अकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट व पोर्टलची स्थापना' या विषयावर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक क्रेडिटचे संकलन, जतन व हस्तांतरणासाठी ही व्यवस्था महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले.तिसऱ्या सत्रातडॉ गणेश काथार, एन सी एस चे डॉ अनिल जाधव, यानी इंटर्नशिप आणि ऑन जा◌ॅब ट्रेनिंग तसेच डॉ लक्षकौशिक पुरी, फील्ड प्रोजेक्ट यावर मार्गदर्शन केले. तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी आणि त्यासमोरील आव्हाने या विषयावर खुली चर्चा घेण्यात आली. प्राध्यापकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत धोरणाच्या अंमलबजावणीतील विविध शैक्षणिक, प्रशासकीय व व्यावहारिक अडचणींवर विचारमंथन केले.कार्यशाळेस धाराशिव जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतील सुमारे २६० प्राध्यापक उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य डॉ. रामदास ढोकळे, प्राचार्य डॉ. हनुमंत माने, प्राचार्य डी. व्ही. माने, प्राचार्य अनुराधा जगदाळे, प्राचार्य सुभाष राठोड, डॉ. अनिल जाधव, डॉ. गणेश कठार, डॉ. लक्ष्मीकौशिक पुरी, उपप्राचार्य डॉ. विनोद देवरकर, डॉ. पद्माकर पिटले, प्रा. जी. एस. मोरे व पर्यवेक्षक शैलेश महामुनी आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन कार्यशाळेचे समन्वयक डॉ. डी. बी. ढोबळे यांनी केले, तर आभार डॉ. चंद्रसेन करे यांनी मानले.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

## पहिला पाऊस : माझी अविस्मरणीय प्रेमकथा

**ख**रंच मला प्रेम झालंय...कुणा व्यक्तीवर नाही, कुणाच्या चेहऱ्यावर नाही, कुणाच्या शब्दांवरही नाही. माझं प्रेम आहे त्या पहिल्या पावसावर. जो दरवर्षी येतो, पण प्रत्येक वेळी पहिल्यांदाच भेटल्यासारखा वाटतो.१. त्याच्या येण्याची चाहूलत्याच्या येण्याची चाहूल लागली की मनात एक वेगळीच धडधड सुरू होते. वैशाख-ज्येष्ठाच्या रखरखत्या उन्हाने तापलेली धरती, निष्पर्ण झालेली झाडं, आणि जीवाची होणारी काहिली... सगळं असह्य होत असतानाच अचानक वाऱ्याची दिशा बदलते.आकाशात हळूहळू काळेकुट्ट ढग दाटून येतात. दूर कुठेतरी मेघगर्जना ऐकू येते. झाडांच्या पानांना अलगद स्पर्शून जाणारा गार वारा अंगावर शहारा आणतो. तो वारा फक्त वारा नसतो, तो एक निरोप असतो. तो सांगत असतो - तो येतोय...जणू निसर्ग एखाद्या मोठ्या उत्सवाची तयारी करत आहे. पक्षी घरट्याकडे परतू लागतात, मुंग्या आपली वारुळं बंद करू लागतात, आणि माणसाचं मन मात्र खिडकीबाहेर कुठेतरी हरवून जातं.आणि मग... सगळी सृष्टी श्वास रोखून वाट पाहत असतानाच, आकाशातून अलगद एक थेंब जमिनीवर येऊन पडतो.पहिला थेंब!२. मातीचा तो पहिला सुगंध - पेट्रिकॉरत्या एका थेंबासरशी मातीच्या कुशीतून एक ओळखीचा सुगंध दरवळतो. इंग्रजीत त्याला पेट्रिकॉर म्हणतात, पण आपल्या मनासाठी तो फक्त सुगंध नसतो. तो असतो बालपणाचा, आठवणींचा आणि हरवून गेलेल्या निरागस क्षणांचा सुगंध.त्या सुगंधात माझी शाळा आहे. शाळा सुटल्यावर दप्तर डोक्यावर घेऊन पावसात भिजत घरी येणारे ते दिवस. छत्री असूनही मुद्दाम पावसात जाण्याचा तो हट्ट. रस्त्याच्या कडेला साचलेल्या पाण्यात कागदी होड्या सोडण्याचा तो निरागस आनंद. ती होडी बुडाली तरी पुन्हा नवी होडी करून सोडण्याची जिद्द.चिखलाने माखलेले पाय, पूर्ण भिजलेला गणवेश आणि घरी पोहोचल्यावर आईच्या रागात लपलेली काळजी. आई ओरडायची... "परत भिजलीस!" पण त्याच हातांनी ओले केस अलगद पुसले जायचे, गरम गरम भजी तळली जायची आणि त्या भज्यांच्या वासात तिची सगळी माया उतरायची.कदाचित म्हणूनच पहिला पाऊस मला प्रत्येक वेळी मोठ्या माणसांच्या गर्दीतून उचलून पुन्हा लहान करते. काळ पुढे सरकत असतो, माणसं मोठी होत असतात, जबाबदाऱ्या वाढत असतात; पण काही आठवणी मात्र ऋतूंसोबत पुन्हा पुन्हा परतत राहतात.३. पाऊस - एक भावना, एक तत्त्वज्ञानपाऊस माझ्यासाठी फक्त आकाशातून बरसणारे पाणी नाही. तो एक भावना आहे.तो शब्द न वापरता बोलतो, स्पर्श न करता जवळ येतो आणि काहीही न मागता खूप काही देऊन जातो.उन्हाने तापलेल्या धरतीवर जेव्हा पहिल्या सरी बरसतात, तेव्हा एक सुंदर सत्य पुन्हा जाणवतं — कुठलाही कोरडेपणा कायमचा नसतो. कितीही कडक ऊन असो, कितीही लांबलेला विरह असो, कितीही थकलेलं मन असो... एक दिवस पाऊस येतोच.म्हणूनच कदाचित पाऊस मला आशावादी वाटतो. तो शिकवतो की संपणं म्हणजे थांबणं नसतं. गळून पडलेलं पान संपत नाही, तर नव्या पालवीसाठी जागा करत असतं. तसंच, आयुष्यातला कोरडेपणाही कायम नसतो. त्याच्या प्रत्येक थेंबात एका नव्या सुरुवातीची चाहूल असते.पावसाकडे पाहताना आणखी एक विचार मनात येतो — माणसांनीही पावसासारखं असावं. पाऊस कुणामध्ये भेद करत नाही. तो श्रीमंताच्या अंगणातही बरसतो आणि गरिबाच्या झोपडीवरही. तो फुलांवरही पडतो आणि काट्यांवरही. तो स्वतःसाठी काहीच राखून ठेवत नाही. फक्त देत राहतो... धरतीला हिरवाई, नद्यांना प्रवाह, झाडांना जीवन, आणि मनाला आठवणी. देण्यातला आनंद काय असतो, हे पावसाकडून शिकावं.४. तो आणि मी - एक शांत क्षणकधी खिडकीत उभं राहून पावसाच्या सरी न्याहाळताना मला असं वाटतं, की प्रत्येक थेंब काचेवर एखादं अपूर्ण वाक्य लिहून जातो. ते वाचता येत नाही, पण त्याचा अर्थ मनाला समजतो.बाहेर कोसळणारा पाऊस... खिडकीवरून ओघळणारे थेंब... हातात गरम चहाचा कप... आणि जवळ एखादं आवडतं पुस्तक... या क्षणाला कशाचीच कमतरता भासत नाही.पाऊस पडतो आणि निसर्ग बदलून जातो. उन्हाने कोमेजलेली पानं पुन्हा तजेलदार होतात. डोंगर हिरवा शालू पांघरतात. माळरानावर हिरवाईची नाजूक नक्षी उमटते. कोरड्या नदीच्या पात्राला पुन्हा खळखळण्याची ओढ लागते. झाडांच्या पानांवर थेंब मोत्यांसारखे विसावतात आणि पक्ष्यांचा किलबिलाटही जणू नव्या सुरावटीत मिसळतो.त्या क्षणी वाटतं — निसर्गालाही आनंद व्यक्त करता येतो, फक्त त्याची भाषा आपल्यापेक्षा वेगळी असते. कधी कधी शांतताही बोलत असते. फक्त तिचं बोलणं ऐकण्यासाठी मन शांत असावं लागतं. आणि पाऊस मला हीच शांतता शिकवतो.पहिला पाऊस पडला की मोबाईल, चिंता, धावपळ, उद्याची काळजी — सगळं काही क्षणभर विसरून जातं. उरतो तो फक्त... मी, पाऊस आणि माझं मन.लोक म्हणतात, प्रेम म्हणजे एखाद्या व्यक्तीवर मनापासून जडणं. पण मला वाटतं, प्रेमाला नेहमी चेहरा असतोच असं नाही. कधी एखाद्या सुगंधावर प्रेम होतं. कधी एखाद्या गाण्यावर. कधी एखाद्या जागेवर. कधी एखाद्या आठवणीवर. आणि कधी... एखाद्या ऋतूवर.माझ्या आयुष्यातील कितीतरी सुंदर क्षण पावसानेच जपून ठेवले आहेत. काही आनंदाचे, काही हळवे, काही मनातच राहून गेलेले... काही क्षण असे असतात, ज्यांना पुन्हा जगता येत नाही; पण एखाद्या पावसाच्या सरीसोबत ते पुन्हा जाणवतात.म्हणून प्रत्येक पावसाळा माझ्यासाठी फक्त ऋतू नसतो. तो असतो आठवणींचं दार उघडणारा एक ऋतू.त्या क्षणी जाणवतं, की आयुष्याचं खरं सौंदर्य नेहमी मोठ्या गोष्टींमध्ये नसतं. ते असतं — मातीच्या सुगंधात, खिडकीवरच्या थेंबांत, चहाच्या वाफेत, पानांच्या सळसळीत, आणि नकळत उमटलेल्या एका हसण्यात.म्हणूनच... हो, मला प्रेम झालंय. त्या पहिल्या पावसावर... जो दरवर्षी आकाशातून उतरतो, धरतीला अलगद कवेत घेतो, निसर्गाला नव्याने फुलवतो, जुन्या आठवणींना जागं करतो... आणि निघून जाताना मात्र मनाच्या एका कोपऱ्यात कायमचा थांबून जातो.काही प्रेमकथा शब्दांत लिहिता येत नाहीत. त्या जगाव्या लागतात... काही प्रेमकथा पूर्ण व्हाव्यात म्हणून नसतातच; त्या फक्त मनाला काहीतरी सुंदर देऊन जाण्यासाठी असतात.माझीही एक अशीच प्रेमकथा आहे... मी आणि पहिला पाऊस. दरवर्षी तो नव्याने येतो, पण माझ्या मनात मात्र प्रत्येक वेळी एकच भावना उमटते —"खरंच... मला प्रेम झालंय!"



- कु. साक्षी बाबूराव साळुंके
श्री छत्रपती शिवाजी कॉलेज ऑफ फार्मसी, कन्नड
वर्ग : बी. फार्म. — चौथे वर्ष

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १० सप्टेंबर २०२६

# कवितेचे घर, मायेची सावली - मितवा



**का**ही घरे विटा, सिमेंट आणि दगडांची असतात. पण काही घरे माणसांनी, विचारांनी आणि प्रेमाने बांधलेली असतात. अशी घरे काळाच्या ओघात पडत नाहीत, ती वाढत जातात, विस्तारत जातात. कन्नड शहरातील 'मितवा' हे असेच एक घर आहे. हे घर डॉ. प्रतिभा अहिरे आणि जागतिक दर्जाचे चित्रकार, पत्रकार राजानंद सुरडकर यांचे आहे, पण खऱ्या अर्थाने ते आम्हा सर्वांचे आहे. ते आमचे हक्काचे माहेर आहे, आमच्या धावपळीच्या, संघर्षाच्या आयुष्यातील मायेची सावली आहे.'मितवा' या शब्दाचा अर्थच आहे - जिवलग मित्र, प्राणसखा. आणि या नावाप्रमाणेच हे घर आम्हा सर्व साहित्यिक, कलाप्रेमी, चळवळीतल्या कार्यकर्त्यांचा जिवलग मित्र बनले आहे.मार्गदर्शक दांपत्य - प्रतिभा अहिरे आणि राजानंद सुरडकरया घराचा आत्मा आहेत दोन माणसे - डॉ. प्रतिभा अहिरे आणि राजानंद सुरडकर. हे केवळ पती-पत्नी नाहीत, तर दोन समांतर विचारधारांचा, दोन सृजनशील प्रवाहांचा संगम आहेत.डॉ. प्रतिभा अहिरे - परिवर्तनवादी कवयित्री व विचारवंतडॉ. प्रतिभा अहिरे यांचे नाव मराठी साहित्यात अत्यंत आदराने घेतले जाते. त्या केवळ कवयित्री नाहीत, त्या परिवर्तनवादी विचारवंत आहेत. त्यांची कविता गुलाबाच्या पाकळ्यांवर रेंगाळणारी कविता नाही. त्यांची कविता ही शेताच्या बांधावरची, कष्टकऱ्यांच्या घामातली, स्त्रियांच्या हुंदक्यातली आणि व्यवस्थेविरुद्ध बंड पुकारणारी आंबेडकरी कविता आहे.त्यांनी आजवर अनेक पुस्तके लिहिली आहेत. कवितासंग्रह, वैचारिक लेख, समीक्षा अशा विविध साहित्य प्रकारात त्यांनी आपला ठसा उमटवला आहे. त्यांचे 'सावित्रीमाई फुले आणि बेईमान लेखण्या' हे पुस्तक तर मराठी वैचारिक विश्वात मैलाचा दगड ठरले आहे. सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले यांचे खरे क्रांतिकारी कार्य कसे आहे आणि प्रस्थापित, ब्राह्मण्यवादी इतिहास लेखनाने ते कसे पद्धतशीरपणे नाकारले, पुसले, याचा अत्यंत अभ्यासपूर्ण आणि परखड पर्दाफाश त्यांनी या पुस्तकात केला आहे. शोषणाचे केंद्र असलेल्या धर्म, वर्ण, जात आणि पितृसत्तेविरुद्ध सावित्रीबाईंनी दिलेला लढा त्यांनी या पुस्तकातून नव्याने अधोरेखित केला. मला हवी असणारी पहाट हा कविता संग्रह त्याशिवाय अनेक ग्रंथ प्रसिद्ध आहेत.त्यांच्या या प्रखर वैचारिक भूमिकेमुळेच त्यांची निवड पहिल्या स्त्री शिक्षिका साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदीझाली होती. रयत शिक्षण संस्थेच्या वतीने झालेल्या या ऐतिहासिक संमेलनाचे अध्यक्षपद भूषवणे हा त्यांच्या साहित्यिक आणि सामाजिक कार्याचा गौरव होता. तिफण कविता महोत्सवाच्या अध्यक्ष,पर्यावरणाच्या रक्षणासाठी 'सुखना बचाओ' सारख्या जनआंदोलनात, 'सुखना बोलावते आहे' सारख्या कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी त्या दिसतात, तेव्हा कळते की त्यांची लेखणी फक्त कागदावर नाही तर जमिनीवरच्या लढ्याशी जोडलेली आहे.त्या आमच्या सहकारी आहेत, पण त्याहून अधिक त्या आमच्या मार्गदर्शक, आमच्या ताई आहेत. कोणताही छोटा-मोठा कार्यक्रम असो, कोणतीही साहित्यिक घडामोड असो, त्या आम्हाला कधीच विसरत नाहीत. "अरे तुम्ही या, तुम्ही बोला, तुम्ही लिहा" असे म्हणत त्या सतत आम्हाला पुढे ढकलत असतात.राजानंद सुरडकर - कुंचल्यातून विश्व टिपणारा कलावंतआणि त्यांचे पती राजानंद सुरडकर सर. त्यांच्या बद्दल काय लिहावे? ते जागतिक दर्जाचे चित्रकार आहेत. त्यांच्या चित्रांमध्ये रंग नाहीत तर भावना आहेत, वेदना आहेत. एका बाजूला ते पत्रकार म्हणून समाजातील वास्तव अत्यंत परखडपणे मांडतात आणि दुसऱ्या बाजूला चित्रकार म्हणून त्या वास्तवाला रंग देतात.त्यांचा सहवास म्हणजे एक विद्यापीठ आहे. त्यांच्यामुळे आम्हाला साहित्य, कला आणि समाज याकडे पाहण्याचा एक निकोप, डोळस आणि चिकित्सक दृष्टिकोन मिळाला. त्यांनी आम्हाला चार भिंतीच्या बाहेरचे जग दाखवले. अनेक मोठी माणसे, मोठे विचारवंत, कलावंत त्यांनी आम्हाला जोडून दिले. ते आम्हाला सोबत घेऊन फिरले, जग दाखवले. त्यांच्या गप्पांमध्येही एक वेगळीच जादू आहे.हे दोघेही कलाप्रेमी दांपत्य आम्हाला फक्त प्रेरणा देत नाहीत, तर आमच्यावर निस्सीम प्रेम करतात. आणि हेच प्रेम आम्हाला लिहिते ठेवते.मितवा - कवितेचे घरआता येऊया पुन्हा 'मितवा' कडे. या घराला मी 'कवितेचे घर' म्हणतो, याला कारणही तसेच आहे.या घराच्या भिंती जर बोलू शकल्या तर त्या कितीतरी कविता ऐकवतील. या घराच्या अंगणात, बैठकीच्या खोलीत, गच्चीवर कितीतरी काव्य मैफली रंगल्या आहेत. नवोदित कवीची थरथरती पहिली कविता इथे बहरली आहे, तर ज्येष्ठ कवींच्या अनुभवी शब्दांना इथे नवी उंची मिळाली आहे.रात्र रात्र चालणाऱ्या या मैफली केवळ कविता वाचनापुरत्या मर्यादित नसतात. इथे कवितेवर चर्चा होते, वाद-विवाद होतात, मतभेद होतात. कधी कवितेच्या एका ओळीवरून तासंतास चर्चा रंगते. आधुनिक कविता, ग्रामीण कविता, दलित कविता, स्त्रीवादी कविता या सर्व प्रवाहांवर इथे मोकळेपणाने बोलले जाते. प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा पूर्ण अधिकार आहे. इथे कुणालाही कमी लेखले जात नाही. मतभेद झाले तरी मनभेद कधीच होत नाहीत. हेच या घराचे खरे संस्कार आहेत.या घरात चित्रे भिंतीवर टांगलेली नाहीत, ती जिवंत आहेत. सुरडकर सरांच्या कुंचल्यातून उतरलेली चित्रे जेव्हा प्रतिभा अहिरे मॅडमच्या कवितेला भेटतात तेव्हा एक वेगळाच आविष्कार घडतो.मायेची सावली :'मितवा' हे आमच्यासाठी हक्काचे ठिकाण आहे. आयुष्याच्या धावपळीत, कधी मन उदास झाले, कधी लिहावेसे वाटले नाही, कधी एकटे वाटले की आमचे पाय आपोआप 'मितवा' कडे वळतात. न सांगता, न कळवता आम्ही तिथे जातो. आणि तिथे गेल्यावर जे प्रेम, जी आपुलकी मिळते, ती शब्दात मांडणे अशक्य आहे.तिथे गेल्यावर गरम चहा आणि सोबत एखाद्या नव्या पुस्तकावर चर्चा तयारच असते. अहिरे मॅडमच्या हातच्या चहाला मायेची चव आहे. तिथे गेल्यावर आम्ही पाहुणे नसतोच, आम्ही घरचेच असतो.आजच्या या धकाधकीच्या, आत्मकेंद्री जगात जिथे माणूस माणसापासून तुटत चालला आहे, तिथे 'मितवा' सारखे घर माणुसकीचा ओलावा टिकवून ठेवते. ते आम्हाला शिकवते की, मोठे होण्यासाठी मोठ्या शहरात जावे लागत नाही, मोठे विचार मनात बाळगले तरी मोठे होता येते.डॉ. प्रतिभा अहिरे आणि राजानंद सुरडकर या दांपत्याने कन्नड सारख्या शहरात राहूनही जागतिक पातळीवर आपल्या कामाचा ठसा उमटवला आहे. त्यांनी केवळ स्वतःसाठी नाही तर आम्हा सर्वांसाठी एक सांस्कृतिक अधिष्ठान निर्माण केले आहे. काल रक्षा बंधना निमित्त आम्हास बोलाऊन आमचा सन्मान केला.शेवटी एवढेच म्हणेन, 'मितवा' हे घर नसून एक विचार आहे. प्रेमाचा, आपुलकीचा, समतेचा आणि सृजनाचा विचार. हा विचार असाच वाढत राहो. या कवितेच्या घराची मायेची सावली आम्हा सर्वांवर अशीच कायम राहो. आमचे मार्गदर्शक अहिरे मॅडम आणि सुरडकर सर यांना दीर्घ आयुष्य लाभो आणि त्यांच्या हातून अशीच साहित्य आणि कलेची सेवा घडत राहो, हीच मनोकामना. अशी माणसं आमच्या जीवनात आहे याचा आम्हास निश्चितच आनंद आहे. प्रेरणादायी पावलांचा हा क्रांतिकारी अक्षर प्रवास आम्हास नियमित घडो याच सदिच्छा!

**डॉ. शिवाजी हुसे**

('एका भटक्यांची शोधयात्रा ' या सदरातील लेख )

# पुंगळ्यातील जातीय वक्तव्याचे प्रकरण चिघळले कायदेशीर कारवाईसाठी अभिप्राय मागवला



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** तालुक्यातील पुंगळा ग्रामपंचायतीच्या २९ ऑगस्ट रोजी झालेल्या ग्रामसभेत बौद्ध समाजाबाबत जातीय अपमानास्पद वक्तव्य केल्याच्या आरोपावरून निर्माण झालेल्या वादाला आता नवे वळण मिळाले आहे. या प्रकरणाच्या निषेधार्थ ८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता निषेध आंदोलन करण्यात आले या आंदोलनाला जिंतूर तालुक्यातील शेकडो समाजबांधव उपस्थित होते. यावेळी बौद्ध समाज बांधवांनी दिलेल्या निवेदनाची पंचायत समितीने दखल घेतली आहे.ग्रामसभेत महिला सरपंचाचे पती व मुलगा यांनी शासकीय कामकाजात हस्तक्षेप करून जातीय शिवीगाळ केल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करून गुन्हा दाखल करावा, अशी मागणीही करण्यात आली होती. यासंदर्भात आज आंदोलन झाल्यानंतर या तक्रारीची दखल घेत गटविकास अधिकाऱ्यांनी जिल्हा परिषद परभणीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे प्रकरण सादर करून कायदेशीर अभिप्राय घेण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. तसेच संबंधित ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना २९ ऑगस्टच्या ग्रामसभेतील कार्यवृत्ताची प्रमाणित प्रत उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.कायदेशीर अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार पुढील निर्णय घेण्यात येणार असल्याचे पंचायत समितीने स्पष्ट केले आहे. त्यामुळे पुंगळा येथील कथित जातीय वक्तव्य प्रकरणात आता प्रशासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.(चौकट)चार दिवस वाट पाहू न्यायासाठी हजारो भीमसैनिक रस्त्यावर उतरतीलसदरील प्रकरणात सर्व पुरावे सिद्ध असताना लिगल ओपिनियन मागवून वेळ घेत आहेत, प्रकरणात आम्ही फिर्यादी होऊ शकतो, पण आम्ही प्रशासनाची वाट पाहत आहोत. सर्व पुरावे असताना सुद्धा टोलवाटोलवी आणि वेळ मारून प्रशासनाला जातीय द्वेषाला खतपाणीच घालायचे असेल तर आमचेही फिर्यादी तयार आहेत. भव्य मोर्चा काढून गुन्हा दाखल करू, न्यायासाठी लोकशाही मार्गाने लढताना जिल्ह्यात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याला स्थानीक प्रशासन जबाबदार राहील. येणाऱ्या रविवारी जिंतूर येथे मोर्चाची नियोजन बैठक असून भीमसैनिकांनी उपस्थीत राहण्याचे आवाहन आंदोलकांकडून करण्यात आले आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १० सप्टेंबर २०२६

# एक संवाद, एक आधार; जीवनाला जगण्याची नवी आशा


दरवर्षी १० सप्टेंबर हा दिवस जगभरात 'जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन' म्हणून पाळला जातो. मानवी जीवनाचे अमूल्यत्व अधोरेखित करणारा आणि संकटात सापडलेल्या व्यक्तीच्या पाठीशी संवेदनशीलतेने उभे राहण्याचा संदेश देणारा हा दिवस आहे. आत्महत्या हा केवळ एका व्यक्तीच्या जीवनाशी संबंधित प्रश्न नाही; तो कुटुंब, समाज, आरोग्यव्यवस्था, शिक्षणव्यवस्था, अर्थव्यवस्था आणि एकूणच मानवी नातेसंबंधांशी जोडलेला गंभीर सामाजिक व सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न आहे. एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यातील तीव्र मानसिक वेदना, एकाकीपणा, कौटुंबिक संघर्ष, आर्थिक अडचणी, शैक्षणिक किंवा व्यावसायिक ताण, नातेसंबंधांतील तणाव, सामाजिक अपमान, आजारपण किंवा भविष्याबद्दल निर्माण झालेली निराशा अशा अनेक कारणांचा एकत्रित परिणाम तिच्या मानसिक अवस्थेवर होऊ शकतो. त्यामुळे आत्महत्येकडे केवळ कमजोरी, भ्याडपणा किंवा चुकीचा निर्णय म्हणून पाहणे हा समस्येचा अतिशय संकुचित दृष्टिकोन ठरतो. या समस्येकडे मानवी वेदना, मानसिक आरोग्य आणि सामाजिक परिस्थिती या तिन्ही अंगांनी पाहणे आवश्यक आहे.जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनाची सुरुवात २००३ मध्ये इंटरनॅशनल असोसिएशन फॉर सुसाइड प्रिव्हेन्शन आणि जागतिक आरोग्य संघटनेच्या सहकार्याने झाली. आत्महत्या रोखण्यासाठी जागतिक स्तरावर जागरूकता निर्माण करणे, या विषयाभोवती असलेला सामाजिक कलंक कमी करणे आणि प्रतिबंधात्मक उपायांना व्यापक स्वरूप देणे हा या दिवसाचा मुख्य हेतू आहे. २०२४ ते २०२६ या कालावधीसाठी 'आत्महत्येविषयीचा दृष्टिकोन बदलूया' ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवण्यात आली असून, २०२६ हे या त्रैवार्षिक अभियानाचे अंतिम वर्ष आहे. या अभियानाचा मूलभूत संदेश असा आहे की आत्महत्येविषयी मौन आणि गैरसमज यांना दूर करून खुलेपणाने, संवेदनशीलतेने आणि जबाबदारीने संवाद साधला पाहिजे. संकटातील व्यक्तीला ऐकून घेणे, तिच्या भावनांचा आदर करणे, तिच्यावर दोषारोप न करणे आणि योग्य वेळी मदतीशी जोडणे हा प्रतिबंधाचा महत्त्वाचा मार्ग आहे.जागतिक आरोग्य संघटनेच्या मते जगभरात दरवर्षी सात लाखांहून अधिक लोक आत्महत्येमुळे मृत्युमुखी पडतात. ही संख्या केवळ आकडेवारी म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. प्रत्येक संख्येमागे एक व्यक्ती, एक कुटुंब, अनेक नाती आणि अनेक अपूर्ण स्वप्ने असतात. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूचा परिणाम तिच्या कुटुंबापुरता मर्यादित राहत नाही; पालक, मुले, भाऊ-बहीण, मित्र, सहकारी आणि संपूर्ण समुदायावर त्याची भावनिक छाया पडते. म्हणून आत्महत्या प्रतिबंधाकडे केवळ घटना घडल्यानंतर प्रतिक्रिया देण्याच्या दृष्टीने पाहण्याऐवजी संकट निर्माण होण्यापूर्वीच व्यक्तीला आधार मिळेल अशी सामाजिक व्यवस्था निर्माण करण्याची गरज आहे. मानसिक आरोग्यसेवा सुलभ करणे, सामाजिक एकाकीपणा कमी करणे, कुटुंबातील संवाद वाढविणे आणि संकटातील व्यक्तीला मदत मागण्यासाठी सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे ही प्रतिबंधाची मूलभूत पावले आहेत.मानसिक आरोग्याबाबत आपल्या समाजातील दृष्टिकोन बदलण्याची आज सर्वाधिक गरज आहे. शरीराला आजार झाला तर आपण डॉक्टरांकडे जातो, औषधोपचार घेतो आणि विश्रांती घेतो; परंतु मनावर ताण आला, नैराश्य जाणवले किंवा सतत अस्वस्थता निर्माण झाली तर त्याकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती अनेकदा दिसून येते. "हे मनाचेच आहे", "थोडे सकारात्मक विचार कर", "स्वतःला सावर" किंवा "तुझ्याकडे तर सर्व काही आहे" अशा वाक्यांनी मानसिक वेदना दूर होत नाहीत. प्रत्येक व्यक्तीची संकटे वेगळी असतात आणि त्यांचा तिच्यावर होणारा परिणामही वेगळा असतो. म्हणून दुसऱ्याच्या दुःखाची तुलना आपल्या अनुभवांशी करणे टाळले पाहिजे. मानसिक त्रास हा व्यक्तीच्या चारित्र्याचा दोष नसून आरोग्याशी संबंधित एक गंभीर बाब आहे, ही जाणीव समाजात रुजली पाहिजे.आत्महत्या प्रतिबंधाचा सर्वांत महत्त्वाचा आधार म्हणजे संवाद. अनेकदा एखादी व्यक्ती संकटात असताना थेट मदत मागत नाही. तिच्या वर्तनात बदल होऊ शकतो, ती अधिक एकाकी राहू शकते, सतत निराश किंवा अस्वस्थ दिसू शकते किंवा पूर्वी आवडणाऱ्या गोष्टींपासून दूर जाऊ शकते. अशा वेळी "काय झाले?" एवढे विचारून थांबण्याऐवजी "तुला काही त्रास होत आहे का?", "तुला माझ्याशी बोलायचे असेल तर मी ऐकण्यासाठी आहे" असा विश्वास देणे आवश्यक आहे. संवाद साधताना समोरच्या व्यक्तीचे बोलणे मध्येच तोडणे, दोष देणे किंवा लगेच उपदेश करणे टाळले पाहिजे. काही वेळा व्यक्तीला उपायापेक्षा प्रथम कोणीतरी आपले म्हणणे मनापासून ऐकावे अशी गरज असते. ऐकून घेणे ही साधी कृती असली तरी तिचे भावनिक महत्त्व मोठे असते.कुटुंबाच्या भूमिकेला या संदर्भात विशेष महत्त्व आहे. कुटुंब व्यक्तीला भावनिक सुरक्षितता देणारे पहिले वर्तुळ असते. मात्र आधुनिक जीवनशैली, कामाचा वाढता ताण, स्थलांतर, डिजिटल माध्यमांचा अतिरेक आणि बदलती कौटुंबिक रचना यामुळे घरात राहूनही भावनिक अंतर वाढताना दिसते. एकाच घरात राहणारे सदस्य एकमेकांशी बोलण्यासाठी पुरेसा वेळ देत नाहीत. पालकांना मुलांच्या अभ्यासाची, नोकरीची आणि भवितव्याची चिंता असते; पण मुलांच्या मनातील भीती, असुरक्षितता, अपयशाची भावना किंवा भावनिक संघर्ष समजून घेण्यासाठी आवश्यक संवाद कमी पडतो. मुलांच्या यशापेक्षा त्यांच्या मानसिक स्वास्थ्याला प्राधान्य देणे आवश्यक आहे. "तुला नेहमी पहिलाच क्रमांक मिळाला पाहिजे" यापेक्षा "काहीही झाले तरी आम्ही तुझ्यासोबत आहोत" हा संदेश त्यांच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण करू शकतो.विद्यार्थी आणि तरुण हे विशेष संवेदनशील वयोगट आहेत. शिक्षणातील तीव्र स्पर्धा, परीक्षेतील अपेक्षा, प्रवेशाच्या संधी, करिअरची अनिश्चितता, बेरोजगारी, पालकांचा दबाव, मैत्री किंवा प्रेमसंबंधांतील तणाव आणि सामाजिक माध्यमांवरील तुलना यामुळे अनेक तरुण मानसिक तणावाचा अनुभव घेतात. आज यशाची व्याख्या अनेकदा गुण, पद, पगार आणि प्रतिष्ठा यांच्याशी जोडली जाते. त्यामुळे अपयश आले की काही तरुणांना स्वतःचे मूल्य कमी झाल्यासारखे वाटू शकते. शिक्षणव्यवस्थेने ही मानसिकता बदलण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांना अपयश हा जीवनाचा एक अनुभव आहे, अंतिम निर्णय नाही, हे समजावून सांगितले पाहिजे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये समुपदेशन, भावनिक शिक्षण, जीवनकौशल्ये आणि तणाव व्यवस्थापन यांना अधिक महत्त्व दिले पाहिजे.सामाजिक माध्यमांच्या युगात मानसिक आरोग्याचा प्रश्न आणखी गुंतागुंतीचा झाला आहे. इतरांच्या जीवनातील यश, आनंद, प्रवास, आर्थिक संपन्नता आणि सामाजिक प्रतिष्ठेची चित्रे सतत पाहताना व्यक्ती नकळत स्वतःची तुलना इतरांशी करू शकते. मात्र सामाजिक माध्यमांवर दिसणारे जीवन हे संपूर्ण वास्तव नसते. प्रत्येकाच्या आयुष्यात संघर्ष असतात, अपयश असते, चिंता असते आणि काही न सांगितलेल्या वेदनाही असतात. त्यामुळे आभासी जगातील प्रतिमांशी आपल्या वास्तवाची तुलना करणे टाळले पाहिजे. डिजिटल साधनांचा विवेकी वापर, प्रत्यक्ष नात्यांना दिलेला वेळ आणि स्वतःच्या भावनांकडे लक्ष देण्याची सवय मानसिक आरोग्यासाठी आवश्यक आहे.आत्महत्या प्रतिबंधाचा प्रश्न तरुणांपुरताच मर्यादित नाही. आर्थिक संकटात सापडलेले कुटुंब, बेरोजगार युवक, व्यवसायात नुकसान झालेल्या व्यक्ती, शेतकरी आणि कामगार, गंभीर आजाराशी सामना करणारे नागरिक, कौटुंबिक हिंसाचार किंवा सामाजिक भेदभावाचा अनुभव घेणारे लोक आणि एकाकीपणाने त्रस्त वृद्ध या सर्व घटकांच्या मानसिक आरोग्याकडे संवेदनशीलतेने पाहण्याची गरज आहे. विशेषतः आर्थिक संकटाचा मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम गंभीर असू शकतो. पैसा कमी पडणे ही केवळ आर्थिक समस्या राहत नाही; त्यासोबत कुटुंबाची जबाबदारी, सामाजिक प्रतिष्ठा, भविष्याची चिंता आणि असुरक्षितता जोडली जाते. अशा परिस्थितीत व्यक्तीला दोष देण्याऐवजी तिला सामाजिक, आर्थिक आणि भावनिक आधार देणे आवश्यक आहे.ग्रामीण भागात मानसिक आरोग्याविषयी जागरूकता वाढविण्याचे आव्हान मोठे आहे. अनेक ठिकाणी मानसिक त्रासाला आजार न मानता स्वभावाचा दोष मानला जातो. मानसिक आरोग्यतज्ज्ञांकडे जाणे म्हणजे समाजात आपली प्रतिमा खराब होईल, अशी भीती काही व्यक्तींना वाटू शकते. त्यामुळे मानसिक आरोग्यसेवा गावपातळीपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे, जिल्हा रुग्णालये, शैक्षणिक संस्था, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून मानसिक आरोग्यविषयक जनजागृती केली पाहिजे. मानसिक आरोग्य हा केवळ मोठ्या शहरातील विषय नसून ग्रामीण समाजाचाही तितकाच महत्त्वाचा प्रश्न आहे, ही जाणीव निर्माण झाली पाहिजे. आत्महत्या प्रतिबंधात माध्यमांची जबाबदारी अत्यंत मोठी आहे. एखाद्या आत्महत्येच्या घटनेचे वृत्तांकन करताना सनसनाटी मथळे, अनावश्यक तपशील, व्यक्तीला दोष देणारी भाषा किंवा घटनेचे उदात्तीकरण टाळले पाहिजे. संवेदनशील वृत्तांकन समाजाला प्रतिबंधात्मक माहिती देऊ शकते. बातमीसोबत मानसिक आरोग्याविषयी मार्गदर्शन, मदत मिळण्याची साधने आणि गरजूंनी तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा असा संदेश दिल्यास माध्यमे समाजाच्या मानसिक आरोग्याच्या दृष्टीने सकारात्मक भूमिका बजावू शकतात. वृत्तपत्रे आणि माध्यमे केवळ घटना सांगणारी साधने नसून सामाजिक विचार घडविणारी प्रभावी माध्यमे आहेत. त्यामुळे या विषयाकडे मानवी संवेदना आणि सामाजिक जबाबदारीने पाहणे आवश्यक आहे. शासन आणि आरोग्यव्यवस्थेची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. मानसिक आरोग्याच्या सेवा सर्वसामान्य नागरिकांना सहज आणि सन्मानपूर्वक उपलब्ध झाल्या पाहिजेत. मानसिक आरोग्यतज्ज्ञांची उपलब्धता वाढविणे, प्राथमिक आरोग्यव्यवस्थेशी मानसिक आरोग्यसेवा जोडणे, शाळा-महाविद्यालयांमध्ये समुपदेशनाची सुविधा उपलब्ध करणे आणि संकटातील व्यक्तींना योग्य मदत मिळण्यासाठी प्रभावी यंत्रणा निर्माण करणे आवश्यक आहे.आत्महत्या प्रतिबंधासाठी प्रत्येक नागरिकाने आपली भूमिका ओळखली पाहिजे. प्रत्येक व्यक्ती मानसिक आरोग्यतज्ज्ञ असणे आवश्यक नाही; परंतु प्रत्येकजण संवेदनशील माणूस होऊ शकतो. आपल्या मित्राच्या वर्तनात अचानक बदल जाणवला तर त्याच्याशी संवाद साधता येतो. एखादा सहकारी सतत तणावाखाली दिसत असेल तर त्याची विचारपूस करता येते. कुटुंबातील वृद्ध व्यक्ती एकाकी होत असेल तर तिच्यासोबत वेळ घालवता येतो. विद्यार्थी चिंताग्रस्त दिसत असेल तर त्याच्यावर केवळ अभ्यासाचे दडपण न आणता त्याच्या मनाची अवस्था जाणून घेता येते. संकटातील व्यक्तीला तिच्या समस्यांचे सर्व उत्तर आपल्याकडे नसले तरी योग्य मदत मिळवून देण्यासाठी आपण दुवा बनू शकतो. हीच सामाजिक संवेदनशीलतेची खरी परीक्षा आहे. समाजात "मदत मागणे म्हणजे कमजोरी" हा गैरसमज दूर करणे आवश्यक आहे. प्रतिकूल परिस्थितीत मदत मागण्याचे धैर्य हे कमजोरीचे नव्हे, तर आत्मजाणीवेचे लक्षण आहे. आपल्या मनावरचा ताण ओळखणे, तो विश्वासू व्यक्तीसमोर व्यक्त करणे आणि आवश्यकतेनुसार तज्ज्ञ मदत घेणे ही आरोग्यदायी कृती आहे. मानसिक आरोग्याविषयी बोलताना लाज वाटू नये. जसे ताप आला की आपण उपचार घेतो, तसे मन अस्वस्थ झाल्यावरही मदत घेणे स्वाभाविक मानले पाहिजे. समाजाने मानसिक आरोग्याची चर्चा सामान्य केली तर अनेक व्यक्तींना योग्य वेळी मदत मिळण्याची शक्यता वाढेल. आत्महत्या प्रतिबंधाचा व्यापक अर्थ संकटाच्या अंतिम टप्प्यावर हस्तक्षेप करणे एवढाच नाही. जीवनात अर्थपूर्ण नाती निर्माण करणे, व्यक्तीला सामाजिक स्वीकार मिळवून देणे, भेदभाव कमी करणे, रोजगार आणि सामाजिक सुरक्षिततेच्या संधी वाढविणे, शिक्षणात मानवी मूल्यांना स्थान देणे आणि आरोग्यसेवा सर्वांसाठी सुलभ करणे हा त्याचा मोठा भाग आहे. मानसिक आरोग्य आणि सामाजिक न्याय यांचा जवळचा संबंध आहे. ज्या समाजात व्यक्तीला आपले दुःख व्यक्त करण्याची मोकळीक असते, अपयशानंतर पुन्हा उभे राहण्याची संधी मिळते आणि संकटात मदतीचा हात पुढे होतो, तो समाज मानसिकदृष्ट्या अधिक सक्षम असतो.१० सप्टेंबरचा जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन आपल्याला म्हणूनच एक महत्त्वाचा सामाजिक संदेश देतो. संकटातील व्यक्तीला तिच्या परिस्थितीसाठी दोष देऊ नका; तिचे म्हणणे ऐका. तिच्या वेदनेची तुलना इतरांच्या वेदनांशी करू नका; तिच्या अनुभवाचा आदर करा. ती मदत मागत असेल तर तिला दुर्लक्षित करू नका; योग्य मदतीपर्यंत पोहोचवा. तिच्या आयुष्यातील एका कठीण प्रसंगाला तिच्या संपूर्ण जीवनाचे अंतिम सत्य मानू नका. परिस्थिती बदलू शकते, योग्य मदत मिळू शकते आणि जीवनाला नवी दिशा मिळू शकते. म्हणून संकटातील व्यक्तीला वेळ, आधार, उपचार आणि आशा मिळणे अत्यंत आवश्यक आहे. आजच्या दिवशी आपण आपल्या घरापासून सुरुवात करूया. मुलांशी फक्त त्यांच्या गुणांबद्दल बोलू नका; त्यांच्या भावनांबद्दलही विचारा. तरुणांच्या अडचणींना हट्ट किंवा अपरिपक्वता म्हणून नाकारू नका. वृद्धांच्या शांततेमागे एकाकीपणा आहे का, हे जाणून घेण्याचा प्रयत्न करा. मित्राच्या हसऱ्या चेहऱ्यामागे काही वेदना आहेत का, याची विचारपूस करा. कार्यस्थळी सहकाऱ्यांशी मानवी नात्याने वागा. मानसिक आरोग्याविषयी चर्चा करण्यास सुरक्षित वातावरण निर्माण करा. कारण आत्महत्या प्रतिबंधाची सुरुवात कोणत्याही मोठ्या योजनेतून नव्हे, तर आपल्या दैनंदिन वर्तनातील संवेदनशील बदलातून होते. मानवी जीवन हे कोणत्याही एका परीक्षेच्या निकालापेक्षा, कोणत्याही एका नात्यापेक्षा, कोणत्याही एका आर्थिक संकटापेक्षा किंवा कोणत्याही एका अपयशापेक्षा मोठे आहे. आयुष्याच्या वाटेवर संकटे येतात, परंतु संकट म्हणजे जीवनाचा शेवट नव्हे. माणसाला पुन्हा उभे राहण्यासाठी कधी कधी केवळ एक विश्वासू व्यक्ती, काही क्षणांचा मनापासून संवाद आणि योग्य मदतीचा मार्ग आवश्यक असतो. म्हणून समाजाने अशी संस्कृती निर्माण केली पाहिजे की जिथे प्रत्येक व्यक्तीला "माझे दुःख कोणीतरी ऐकेल", "माझ्या अडचणीची थट्टा केली जाणार नाही" आणि "गरज पडल्यास मला मदत मिळेल" असा विश्वास वाटेल.जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन हा केवळ एका दिवसाचा उपक्रम ठरू नये. मानसिक आरोग्याविषयीचा संवाद वर्षभर सुरू राहिला पाहिजे. शाळा, महाविद्यालये, कुटुंबे, कार्यस्थळे, आरोग्यसंस्था, माध्यमे आणि समाजसंस्था यांनी एकत्रितपणे संवेदनशील वातावरण निर्माण केले पाहिजे. प्रत्येक व्यक्तीच्या मानसिक आरोग्याला सन्मान मिळाला पाहिजे. दुःख व्यक्त करण्याला कमजोरी समजले जाऊ नये आणि मदत मागण्याला लाजेची बाब मानले जाऊ नये. समाजाच्या प्रगतीचे खरे मोजमाप केवळ आर्थिक विकासात नसून संकटात असलेल्या आपल्या माणसांच्या पाठीशी आपण किती ठामपणे उभे राहतो यात आहे. आजच्या जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनानिमित्त आपण एक सामूहिक संकल्प करूया, मौनाऐवजी संवादाची निवड करूया, उपेक्षेऐवजी आपुलकीची निवड करूया, दोषारोपाऐवजी समजूतदारपणाची निवड करूया आणि निराशेऐवजी आशेचा संदेश देऊया. आपल्या आसपासच्या व्यक्तीच्या मनातील वेदना आपण पूर्णपणे समजू शकूच असे नाही; परंतु ती वेदना ऐकण्याची तयारी आपण नक्की दाखवू शकतो. प्रत्येक संकटग्रस्त व्यक्तीला योग्य वेळी योग्य आधार मिळावा यासाठी आपण दुवा बनू शकतो. एका प्रश्नातून संवाद सुरू होऊ शकतो, संवादातून विश्वास निर्माण होऊ शकतो, विश्वासातून मदतीचा मार्ग खुला होऊ शकतो आणि त्या मदतीतून जीवनाला नवी दिशा मिळू शकते. म्हणूनच आजचा संदेश स्पष्ट आहे की एक संवाद साधूया, एक आधार देऊया, मौनाची भिंत तोडूया आणि प्रत्येक जीवनाला जगण्याची नवी आशा देऊया; कारण प्रत्येक जीवन अमूल्य आहे आणि प्रत्येक व्यक्ती महत्त्वाची आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
ईमेल — bagate.rajendra5@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १० सप्टेंबर २०२६

# जोडीदार निवडीचे स्वातंत्र्य आणि खोट्या प्रतिष्ठेचा विळखा - श्रुति जैन



भारतात अनेक आई-वडील अभिमानाने सांगतात की, त्यांनी आपल्या मुलींना जोडीदार निवडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य दिले आहे. काही काळासाठी ही गोष्ट खरीही वाटते. मुलगी लग्नाचे अनेक प्रस्ताव नाकारू शकते, करिअरला प्राधान्य देत लग्न पुढे ढकलू शकते आणि आपल्या आयुष्याचे निर्णय घेण्याचा अधिकार खरोखरच आपल्याकडे आहे, असा विश्वास बाळगू शकते. परंतु हळूहळू तिला जाणीव होते की हे स्वातंत्र्य विनाअट नाही, तर ते एका अलिखित करारासह येते. तिच्या पसंतीचा खरा सन्मान तोपर्यंतच केला जातो, जोपर्यंत ती सामान्य विवाहप्रस्ताव नाकारत असते. खरी परीक्षा तेव्हा सुरू होते, जेव्हा ती अशा प्रस्तावाला 'नाही' म्हणते ज्याला कुटुंब आणि समाज 'आदर्श स्थळ' मानतात—प्रतिष्ठित सरकारी नोकरी, कोट्यवधींचे पॅकेज, उच्च सामाजिक दर्जा किंवा प्रभावशाली कुटुंब. इथूनच तिच्या स्वातंत्र्याच्या मर्यादा ठरू लागतात. 'हे तुझे आयुष्य आहे, निर्णय तुझा असेल' यासारख्या गप्पा अचानक गायब होतात. त्यांची जागा भावनिक दबाव, अपराधीपणाची भावना, नातेवाईकांचे सल्ले आणि कुटुंबाची 'असे स्थळ पुन्हा मिळणार नाही' ही चिंता घेते.

**पर्यायांमधून निवडीचे स्वातंत्र्य**

त्याच क्षणी मुलीला समजून चुकते की तिला जोडीदार निवडण्याचे नव्हे, तर कुटुंबाने आधीच मान्य केलेल्या पर्यायांमधून निवड करण्याचे स्वातंत्र्य दिले गेले होते. तिची स्वायत्तता तोपर्यंतच वैध होती, जोपर्यंत ती कुटुंबाच्या अपेक्षांच्या चौकटीत निर्णय घेत होती. तिची इच्छा या अपेक्षांशी भिडताच तिचे स्वातंत्र्य केवळ एक भ्रम ठरते. नात्याचे निकष अचानक बदलतात. मुलगा भावनिकदृष्ट्या परिपक्व आहे की नाही, किंवा तो समान दर्जाचा जोडीदार बनू शकतो की नाही, हे पाहिले जात नाही. चर्चा केवळ त्याचे वार्षिक उत्पन्न, जात, धर्म आणि कुटुंबाच्या प्रतिष्ठेवर केंद्रित होते. या स्थळाला आयुष्यात एकदाच मिळणारी सुवर्णसंधी म्हणून सादर केले जाते. अशा वेळी मुलीचा नकार म्हणजे तिचा स्वतंत्र विचार मानला जात नाही, तर त्याला बालिश हट्ट, अपरिपक्वता किंवा कृतघ्नता ठरवले जाते. त्यानंतर भावनिक ब्लॅकमेल आणि सुप्त दबावाचे संपूर्ण तंत्र तिला हे पटवून देण्यात गुंतते की या 'आदर्श' नात्याबाहेर आयुष्यात काहीच उरलेले नाही.

महानगरांमध्ये राहणाऱ्या एका वर्गाला 'अरेंज मॅरेज'चा दबाव पारंपरिक वाटू शकतो, पण भारतातील बहुतांश महिलांच्या आयुष्यातील हेच वास्तव आहे. ज्या मुलींना लहानपणापासून स्वतंत्रपणे विचार करण्याचे शिक्षण दिले जाते, त्यांनाच ऐन वेळी सर्वात महत्त्वाच्या वैयक्तिक निर्णयावर कुटुंबापुढे झुकावे लागते.

विद्रोह केवळ आई-वडिलांच्या असहमततेतून नाही, तर स्वतःचा हक्क समजलेली स्वायत्तता अचानक हिरावून घेतल्यामुळे जन्माला येतो. पितृसत्ताक समाजात मुलींना सक्षम बनवण्यापेक्षा 'संरक्षणाची' गरज असणाऱ्या व्यक्ती म्हणून पाहिले जाते. 'योग्य वयात' लग्न उरकण्याची घाई केवळ सामाजिक दबावातून नसते, तर मुलगी स्वतःच्या पसंतीने कुटुंबाला अमान्य अशा व्यक्तीवर प्रेम करू लागेल या भीतीतूनही असते. लग्न मुलीच्या भावना, भूतकाळ किंवा मानसिक आघात पुसून टाकू शकत नाही. ज्या महिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी नसतात, त्यांच्यासाठी नकार देणे हा केवळ पर्याय नसून खूप मोठा धोका असतो. या संपूर्ण प्रक्रियेत भावनिक सुसंगततेला एक अनावश्यक चैनीची गोष्ट मानले जाते; तर दुसरीकडे, 'तडजोड करणे' हे स्त्रीचे कर्तव्य भासवून तिच्यासमोर वाढून ठेवले जाते.

ही बाब तेव्हा अधिक उघड होते जेव्हा एखादी महिला आधीपासूनच दुसऱ्या कोणावर तरी प्रेम करत असते—विशेषतः जर तो पुरुष तिच्याच जातीचा किंवा समुदायाचा नसेल. निव्वळ आर्थिकदृष्ट्या वरचढ किंवा सामाजिकदृष्ट्या अधिक स्वीकारार्ह स्थळासाठी तिच्या पसंतीला नाकारणे हेच दर्शवते की, आजही विवाहाला 'सोबत निभावण्याचे नाते' न मानता केवळ 'सामाजिक प्रतिष्ठा टिकवण्याचे साधन' मानले जाते. आणि जर तिने अफाट धैर्य एकवटून असा विवाहप्रस्ताव धुडकावून लावलाच, तरी तिची परीक्षा तिथे संपत नाही. कुटुंब, नातेवाईक आणि ओळखीचे लोक तिच्यावर प्रश्नांचा भडिमार थांबवत नाहीत. ती जिथे कुठे जाईल तिथे एकच प्रश्न तिचा पाठलाग करतो— *"अरे, तुझे लग्न तर त्या मुलाशी ठरले होते ना?"*

जर नंतर तिला त्याच 'हैसियतीचा' मुलगा मिळाला नाही, किंवा तिने अविवाहित राहण्याचा निर्णय घेतला, तर तिने नाकारलेले ते स्थळ तिच्यासमोर आयुष्यभर असे काही उदाहरण म्हणून ठेवले जाते, ज्याद्वारे तिला सतत ही जाणीव करून दिली जाते की तिने आयुष्यातील सर्वात मोठी चूक केली आहे—अशी एक अपराधीपणाची भावना (Guilt), जी तिला मरेपर्यंत आपल्या उराशी बाळगावी लागते.

**अपेक्षांची भलीमोठी यादी**

भारतात आणि विशेषतः दक्षिण आशियाई समाजात वर्षानुवर्षे चालत आलेल्या 'अरेंज मॅरेज'चे स्वरूपही आज बदलले आहे. कुटुंबांच्या भेटीगाठींची पारंपरिक पद्धत आता कॉर्पोरेट नोकरभरती प्रक्रियेसारखी (Corporate Hiring Process) झाली आहे. युट्यूबवरील रिलेशनशिप 'तज्ज्ञां'कडून प्रेरणा घेतलेल्या प्रश्नांची यादी घेऊन तरुण-तरुणी एकमेकांची मुलाखत घ्यायला बसतात. हे प्रश्न समजून घेण्यासाठी नसून पारखून घेण्यासाठी विचारले जातात.

तो विचारतो, *"तू माझ्या आई-वडिलांचे प्रत्येक म्हणणे ऐकशील आणि त्यांचा आदर करशील का?"*

ती उत्तर देते, *"मी त्यांचा आदर नक्की करेन, पण स्वतःची ओळख गमावून नाही."*

फक्त या एका उत्तरावरून मुलगा तिला 'उद्धट' मानून मोकळा होतो आणि ती त्याला 'पितृसत्ताक' वृत्तीचा समजून घेते. संपूर्ण भविष्याचा निर्णय प्रत्यक्ष अनुभवांवर आधारित न होता केवळ कल्पित भीती आणि संशयावर घेतला जातो. अशा व्यवस्थेत प्रामाणिकपणा एक ओझे बनतो. खरे व्यक्तिमत्त्व लपवले जाते आणि एका जिवंत माणसाऐवजी अत्यंत काळजीपूर्वक सजवलेली एक खोटी प्रतिमा समोर ठेवली जाते. तिथे उद्देश एकमेकांना समजून घेणे हा नसून केवळ 'मुलाखत' उत्तीर्ण होणे हाच उरतो.

**शेवटी विवाहाचा खरा उद्देश तरी काय आहे?**

विवाह हा दोन व्यक्तींनी एकत्र येऊन आयुष्य घडवण्याची एक संस्था आहे, की केवळ शेजारी-पाजाऱ्यांच्या आणि समाजाच्या बोलण्यापासून कुटुंबाचा बचाव करणारी एक ढाल? जर एखादी सज्ञान व्यक्ती कोणाचा हात धरायचा आणि कोणाचा हात सोडायचा हे स्वतःच ठरवू शकत नसेल, तर व्यक्तिगत स्वातंत्र्याचे संविधानाने दिलेले आश्वासन केवळ पोकळ ठरते. आई-वडिलांचे काम मार्गदर्शन करणे आहे, गाडी चालवणे (स्टीअरिंग हातात ठेवणे) नव्हे. खऱ्या स्वातंत्र्यामध्ये चूक करण्याचे स्वातंत्र्यही समाविष्ट असते. सज्ञान माणसे आपल्या चुकांमधून शिकतात, त्यातून पुढे जातात आणि स्वतःला सावरून उभे राहायलाही शिकतात. 'संरक्षणा'च्या नावाखाली त्यांच्याकडून निर्णय घेण्याचा अधिकारच हिरावून घेणे, हे सहसा त्यांनी स्वतः केलेल्या संभाव्य चुकांपेक्षा कितीतरी पटीने अधिक नुकसान पोहोचवणारे ठरते. जर समाजाला खरोखरच केतन हत्याकांड किंवा अशा प्रकारच्या इतर शोकांतिका रोखायच्या असतील, तर सर्वप्रथम हे मान्य करावे लागेल की—आपला जीवनसाथी निवडण्याचे स्वातंत्र्य हा कोणाच्या मर्जीने दिला जाणारा किंवा हिरावून घेतला जाणारा कोणताही 'विशेषाधिकार' नाही; तर तो प्रत्येक व्यक्तीच्या वैयक्तिक स्वायत्ततेचा एक मूलभूत आणि अविभाज्य हक्क आहे.

**लेखिका : श्रुति जैन**
**अनुवाद: प्रा. प्रियदर्शन भवरे,**
**बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय,**
**जालना.**
**पूर्व प्रसिद्धी : द वायर, हिंदी**
**(०१/०८/२०२६ )**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १० सप्टेंबर २०२६


## पारंपरिक खाद्यसंस्कृतीला आधुनिकतेची चव



**छत्रपती संभाजीनगर :** पारंपरिक खाद्यपदार्थांची पौष्टिकता आणि आधुनिक सादरीकरणाची सांगड घालत विद्यार्थिनींनी आपल्या पाककौशल्यासोबतच सर्जनशीलतेचे अनोखे दर्शन घडविले. डॉ. (सौ.) इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयाच्या गृहशास्त्र विभागाच्या वतीने पोषण माहानिमित्त आयोजित पाककला स्पर्धेला विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.'Traditional Food – Modern Twist' अर्थात 'पारंपरिक खाद्यपदार्थांना आधुनिक रूप' ही या स्पर्धेची संकल्पना होती. पारंपरिक खाद्यसंस्कृतीचा वारसा जपत त्यामध्ये आधुनिकता, नावीन्य आणि पौष्टिकतेचा समावेश करण्याचा अभिनव प्रयत्न विद्यार्थिनींनी केला. विविध पारंपरिक पदार्थांना आकर्षक, रुचकर आणि आरोग्यदायी स्वरूप देत त्यांनी पाककलेतील कल्पकतेची प्रचिती दिली.स्पर्धेत स्प्राऊट रेनबो चाट, गव्हाच्या पिठाची बाकरवडी, हांडवा, मिसळ टार्ट मिनी, इडली सँडविच, पखाला भात, पोळीचा पिझ्झा, धिरडे, महाराष्ट्रीयन थाळी, हेल्दी सँडविच, बीट मोमोज, चणे-शेंगदाणे चाट, स्प्राऊट चाट, पनीर चिला, बीटरूट पराठा व सँडविच, कुरडई नूडल्स, पापड चाट, सोया चंक्स अशा विविध पौष्टिक व नाविन्यपूर्ण पदार्थांचे सादरीकरण करण्यात आले. पारंपरिक पदार्थांना आधुनिक रूप देताना चव, पोषणमूल्य, सादरीकरण आणि कल्पकता यांचा सुरेख मेळ साधण्यात आला.या उपक्रमासाठी जिल्हा शासकीय रुग्णालय, जालना येथील आहारतज्ज्ञ रश्मी जोशी रिसोर्स पर्सन म्हणून उपस्थित होत्या. विद्यार्थिनींशी संवाद साधताना त्यांनी पोषणाचे महत्त्व स्पष्ट केले. विद्यार्थी जीवनात घेतलेला संतुलित आणि पौष्टिक आहार हा भविष्यातील निरोगी आयुष्याची भक्कम पायाभरणी करतो, असे त्यांनी सांगितले. दैनंदिन आहारामध्ये आवश्यक पोषक घटकांचा योग्य समावेश, संतुलित आहाराच्या सवयी, पोषण माहाचे महत्त्व तसेच आरोग्यदायी जीवनशैली याबाबत त्यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अन्विता अग्रवाल होत्या. त्यांनी विद्यार्थिनींच्या पाककौशल्याचे आणि सर्जनशीलतेचे कौतुक केले. पारंपरिक खाद्यसंस्कृतीचा वारसा जपत त्याला आधुनिक, आकर्षक आणि पौष्टिक स्वरूप देणे ही आजच्या काळाची गरज आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थिनींच्या कलागुणांना वाव मिळतो, आत्मविश्वास वाढतो आणि आरोग्यविषयक जागरूकताही निर्माण होते, असे त्यांनी नमूद केले.या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. मंगल मोरे, डॉ. वर्षा पाईकराव, डॉ. नेत्रा शेळके, डॉ. वैभवी थोटे, डॉ. प्रियांका भिंगारे आणि डॉ. शिला जीरे यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थिनींच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण स्पर्धेला उत्साहपूर्ण आणि सर्जनशील वातावरण लाभले.पारंपरिक चवीला आधुनिकतेची जोड, पौष्टिकतेला प्राधान्य आणि सर्जनशीलतेला व्यासपीठ देणारा हा उपक्रम विद्यार्थिनींसाठी केवळ पाककला स्पर्धा न ठरता आरोग्यदायी जीवनशैली, खाद्यसंस्कृती आणि नवोन्मेष यांचा सुंदर संगम ठरला.

## बीड जिल्ह्यात कुणबी व मराठा-कुणबी जात प्रमाणपत्रांसाठी १० ते १७ सप्टेंबर दरम्यान विशेष शिबिरे

**बीड (भगवंत पाळवदे) :** मराठा समाजातील नागरिकांना कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र तसेच जात पडताळणी प्रमाणपत्र विनाविलंब व सुलभतेने मिळावे, या उद्देशाने बीड जिल्हा प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. या कार्यवाहीला अधिक गती देण्यासाठी प्रशासनाच्या वतीने जिल्ह्यात १० ते १७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत सर्व महसूल मंडळांच्या स्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.राज्य शासनाच्या निर्देशानुसार प्रशासकीय कामकाज अधिक लोकाभिमुख करण्यासाठी ही शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत. आठवडाभर चालणाऱ्या या शिबिरांमध्ये जुन्या महसूल नोंदी व पुरावे शोधणे, नागरिकांकडून नव्याने प्राप्त होणाऱ्या अर्जांची तातडीने छाननी करणे आणि पात्र लाभार्थ्यांना जागेवरच प्रमाणपत्रांचे वितरण करणे, यावर विशेष भर दिला जाणार आहे.या संपूर्ण प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि नागरिकांच्या अडचणींचे तत्काळ निराकरण करण्यासाठी उपजिल्हा निवडणूक अधिकारी मनोज घोडे पाटील यांची 'नोडल अधिकारी' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ते दररोज उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व जात पडताळणी समिती यांच्याशी समन्वय ठेवून कामकाजात पारदर्शकता आणि गती आणण्याचे काम पाहतील.दोन लाखांवर अर्ज मंजूरजात प्रमाणपत्र वितरणात बीड जिल्हा प्रशासनाने अत्यंत वेगाने कार्यवाही केली आहे. ७ सप्टेंबर २०२६ पर्यंतच्या अद्ययावत आकडेवारीनुसार, जिल्ह्यात कुणबी व मराठा-कुणबी जात प्रमाणपत्रासाठी एकूण २ लाख १० हजार ९४१ अर्ज प्राप्त झाले होते. यापैकी प्रशासनाने तब्बल २ लाख १० हजार ९३१ अर्ज मंजूर करून नागरिकांना मोठा दिलासा दिला आहे.हैदराबाद गॅझेटनुसार शंभर टक्के कार्यवाहीहैदराबाद गॅझेटवर आधारित पुराव्यांची तपासणी करून प्रमाणपत्र देण्याची प्रक्रियाही जिल्ह्यात प्रभावीपणे राबवली जात आहे. २ सप्टेंबर २०२५ च्या शासन निर्णयानुसार, या अनुषंगाने प्रशासनाकडे एकूण ५५४ अर्ज प्राप्त झाले होते. या सर्वच्या सर्व ५५४ अर्जांची छाननी करून ते मंजूर करण्यात आले आहेत.तालुकानिहाय शिबिरांचे वेळापत्रक व ठिकाणेपात्र नागरिकांना प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही जलद गतीने होण्यासाठी खालीलप्रमाणे महसूल मंडळ स्तरावर शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे: * बीड तालुका: * ११ सप्टेंबर: लिंबागणेश, येळंबघाट * १५ सप्टेंबर: बीड, चऱ्हाटा, कुर्ला, नाळवंडी, पिंपळनेर, पारगाव सिरस, मांजरसुंबा, घाटसावळी, पाली * १६ सप्टेंबर: पेंडगाव, राजुरी नं, नेकनूर, चौसाळा, म्हाळसजवळा * गेवराई तालुका: * १५ व १६ सप्टेंबर: उमापूर, धोंडराई, रेवकी, तलवाडा, गेवराई, मादेगाव, चकलांबा, पाडळसिंगी, कोळगाव, मादळमोही, पाचेगाव, जातेगाव, सिरसदेवी * शिरुर कासार तालुका: * ११ सप्टेंबर: शिरुर का., गोमाळवाडा * १५ सप्टेंबर: रायमोह, खालापुरी * १६ सप्टेंबर: तिंतरवणी, ब्र. येळंब * पाटोदा तालुका: * ११ सप्टेंबर: थेरला * १२ व १५ सप्टेंबर: अंमळनेर, दासखेड, कुसळंब * १६ सप्टेंबर: पाटोदा * आष्टी तालुका: * ११ सप्टेंबर: कडा, टाकळसिंग, धामणगाव * १२ व १५ सप्टेंबर: आष्टी ह.नां., पिंपळा, डोईठाण, आष्टी व दौलावडगाव * १६ सप्टेंबर: दादेगाव व धानोरा * माजलगाव तालुका: * १० सप्टेंबर: मंजरथ * ११ सप्टेंबर: तालखेड व किट्टी आडगाव * १५ सप्टेंबर: गंगामसला व दिंद्रुड * १६ सप्टेंबर: नित्रुड * १७ सप्टेंबर: माजलगाव * धारुर तालुका: * १० सप्टेंबर: धारुर * ११ सप्टेंबर: अंजनडोह * १५ सप्टेंबर: मोहखेड * १६ सप्टेंबर: तेलगाव * वडवणी तालुका: * ११ सप्टेंबर: कवडगाव बु. * १५ सप्टेंबर: चिंचवण * १७ सप्टेंबर: वडवणी * अंबाजोगाई तालुका: * १० सप्टेंबर: अंबाजोगाई, घाटनांदूर * ११ सप्टेंबर: बर्दापूर, राडी * १५ सप्टेंबर: उजनी, पाटोदा म. * १६ सप्टेंबर: लोखंडी सावरगाव * केज तालुका: * ११ सप्टेंबर: केज व मसाजोग * १२ सप्टेंबर: ह. पिंप्री व नांदूरघाट * १५ सप्टेंबर: विडा व होळ * १६ सप्टेंबर: बनसरोळा, युसुफ वडगाव व चिंचोलीमाळी * परळी तालुका: * १५ सप्टेंबर: सिरसाळा, नागापूर, पिंपळगाव गाढे * १६ सप्टेंबर: मोहा, धर्मापुरी, परळी वै.मदतीसाठी हेल्पलाईन क्रमांक:मंडळ स्तरावर आयोजित करण्यात आलेल्या या विशेष मोहिमेचा नागरिकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा. तसेच आवश्यक त्या कागदपत्रांसह आपल्या जवळच्या महसूल मंडळातील शिबिरात उपस्थित राहून अर्ज करावेत. प्रमाणपत्र मिळविण्याबाबत कोणतीही अडचण आल्यास नागरिकांनी जिल्ह्याच्या ०२४४२-२५२६९० (02442-252690) या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी आणि बीड जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## आरोग्य विद्यापीठात राजे उमाजी नाईक जयंती उत्साहात साजरी




**नाशिक :** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात राजे उमाजी नाईक जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी मा. कुलगुरु डॉ. व्यंकट गिते यांनी राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला तसेच कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ, परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू यांनी अभिवादन केले.

यावेळी राजे उमाजी नाईक यांच्या कार्याची माहिती विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. देवेंद्र पाटील यांनी दिली. या कार्यक्रमास ऑड.संदीप कुलकर्णी, श्री. प्रकाश पाटील, श्री. संदीप राठोड, श्री. यशवंत पाटील, श्रीमती लक्ष्मीछाया जहागिरदार, श्री. समाधान जाधव, श्री. मानसी हिरे, श्री. अविनाश सोनवणे, श्री. दिलीप दोडे, श्री. नंदन वाघ, श्री. रोहित भोये, श्री. अक्षय मरकड, श्री. घनःश्याम धनगर, श्री. नाना परभणे, श्री.शांताराम गुंजाळ, श्री. राजेंद्र दिवे आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १० सप्टेंबर २०२६


## पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालयात आद्य क्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांची जयंती साजरी



**छत्रपती संभाजीनगर :** येथील अजिंठा शिक्षण संस्था संचलित पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालयात आज दिनांक: 07 /09 /2026 रोजी सोमवारी लोकप्रशासन विभागाच्या वतीने आद्य क्रांतिकारक उमाजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते . या व्याख्यानाचे प्रमुख व्याख्याते म्हणून इतिहास विभागाचे विभाग प्रमुख डॉ.भास्कर टेकाळे यांनी उमाजी नाईक यांच्या जीवन व कार्य यांचा परिचय करून दिला.उमाजी नाईक हे महाराष्ट्राचे आद्य क्रांतिकारक म्हणून ओळखले जातात उमाजी नाईक यांनी ब्रिटिश कालखंडामध्ये इंग्रजांच्या विरुद्ध सर्वप्रथम पुणे जिल्ह्यात पुरंदरच्या पायथ्याशी ब्रिटिश सरकारविरुद्ध सशस्त्र उठाव केले.या उठावात त्यांनी ब्रिटिश सरकार व इंग्रज अधिकारी यांना निकराची झुंज देऊन सशस्त्र उठाव करून आपला धबधबा निर्माण केला होता.त्यामुळे ब्रिटिश सरकारने त्यांच्याविरुद्ध प्रखर असा हल्ला करून उमाजी नाईक यांना पकडून फाशी देण्यात आली हा प्रसंग महाराष्ट्राच्याच नव्हे तर हिंदुस्थानच्या इतिहासातील सशस्त्र क्रांतिकारकाचा एक महत्वपूर्ण असा महत्त्वपूर्ण प्रसंग असून उमाजी नाईक हे त्यांच्या बलिदानामुळे आद्य क्रांतिकारक म्हणून संबोधले जातात असे भास्कर टेकाळे यांनी उमाजी नाईक यांच्या कार्याचा आढावा घेताना सांगितले.राष्ट्रवादाचे प्रखर असे ज्वलंत उदाहरण म्हणजे उमाजी नाईक असे ते म्हणाले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पंडित नलावडे हे होते अध्यक्षीय समारोप करताना देश हित जोपासले पाहिजे देशासाठी प्राण दिलेल्या सर्व स्वातंत्र्यसेनानींना आपण त्यांच्या कार्याला अभिवादन केले पाहिजे.देशामुळे नागरिकांना ओळख असते देशामुळे सर्व अधिकार हे मनुष्य ला प्राप्त होतात. म्हणून राष्ट्रहित जोपासण्यासाठी देशभक्ती ही महत्वपूर्ण असून सर्व नागरिकांनी, विद्यार्थ्यांनी देशाची हित जोपासले पाहिजे देशामुळेच आपल्याला सर्वकाही अधिकार प्राप्त होत असतात असे नलावडे म्हणाले या कार्यक्रमाच्या प्रसंगी मुख्याध्यापिका डॉ.रेखा भाग्यवंत मॅडम याप्रसंगी उपस्थित होत्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लोकप्रशासन विभागाच्या डॉ. स्वाती नरवडे यांनी केले तर या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. गोविंद फड यांनी केले.

याप्रसंगी महाविद्यालयातील डॉ. दिलीप बिरुटे, डॉ. प्रशांत देशमुख डॉ.पांडुरंग डापके डॉ.राजू वनारसे डॉ. श्रीकांत जाधव प्रा. प्रफुल्ल देवरे, डॉ. शिल्पा जीवरग डॉ ज्योती आदाने डॉ .संतोष तांदळे डॉ. विक्रम भुतेकर डॉ.तुषार कांबळे डॉ. लक्ष्मीनारायण कुरपटवार प्रा. रामहरी सोंडगे डॉ.राजू तुपे आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थी -विद्यार्थिनी यांनी कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.






## मराठवाड्यात ३ लाख १६ हजारांहून अधिक कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप

**छत्रपती संभाजीनगर (भगवंत पाळवदे) :** मराठवाड्यात कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रमाणपत्रांच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी शासनाकडून सातत्याने कार्यवाही करण्यात येत असून, आतापर्यंत प्राप्त झालेल्या ३ लाख १७ हजार ५६९ अर्जांपैकी ३ लाख १६ हजार ९७७ नागरिकांना कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले आहे. तसेच जात पडताळणीसाठी प्राप्त २१ हजार ५१ अर्जांपैकी १६ हजार ११० प्रकरणांमध्ये जात पडताळणी प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. शासनाची कार्यवाही पारदर्शक असून, मराठा समाजाला कायदेशीर व टिकणारे आरक्षण देण्याची शासनाची सकारात्मक भूमिका असल्याची माहिती मराठी भाषा व उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत यांनी आज स्मार्ट सिटी कार्यालयात पत्रकारांशी संवाद साधताना दिली. यावेळी आमदार प्रसाद लाड उपस्थित होते.शिंदे समिती स्थापन झाल्यानंतर मराठवाड्यात करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती देताना मंत्री डॉ. सामंत म्हणाले की, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, लातूर आणि धाराशिव या आठ जिल्ह्यांमध्ये कुणबी प्रमाणपत्राच्या प्रक्रियेला गती देण्यात आली आहे. एकूण ३,१७,५६९ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ३,१६,९७७ प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली आहेत. याशिवाय २,९५,३०५ प्रमाणपत्रे १० टक्के आरक्षणाच्या अनुषंगाने देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.जात पडताळणी प्रक्रियेबाबत माहिती देताना मंत्री डॉ. सामंत यांनी सांगितले की, मराठवाड्यात २१,०५१ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी १६,११० प्रकरणे निकाली काढून प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. या प्रक्रियेत केवळ ६४ प्रकरणे नामंजूर झाली असून, ही संख्या एकूण अर्जांच्या तुलनेत सुमारे ०.३ टक्के आहे. उर्वरित प्रकरणांवरही नियमानुसार कार्यवाही सुरू असून, नागरिकांना आवश्यक त्या प्रमाणपत्रांची पूर्तता करून देण्यासाठी प्रशासनाला निर्देश देण्यात आले आहेत.शासनाने उपलब्ध करून दिलेल्या जुन्या अभिलेखांच्या माध्यमातूनही नागरिकांना मोठ्या प्रमाणात सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. आतापर्यंत शोधण्यात आलेल्या ५७ लाख नोंदी जनतेला पाहता याव्यात यासाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. ग्रामपंचायत स्तरापर्यंत ही माहिती पोहोचविण्यासाठी तसेच नागरिकांना आवश्यक माहिती सहज उपलब्ध व्हावी यासाठी १० ते १७ सप्टेंबरदरम्यान विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.न्यायमूर्ती शिंदे समितीचा मराठवाडा दौरा ७ सप्टेंबरपासून सुरू झाला असून, या अनुषंगाने विभागातील प्रशासनाशी समन्वय साधून कार्यवाहीचा आढावा घेण्यात येत आहे. आजच्या बैठकीत उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी तसेच जात पडताळणी समितीचे प्रमुख अधिकारी सहभागी झाले होते. स्थानिक पातळीवरील कार्यवाही अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी वरिष्ठ अधिकारी आणि जिल्हा प्रशासन यांच्यात समन्वय साधण्यात आला.हैदराबाद गॅझेटियरच्या अनुषंगाने प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली असून, यासंदर्भातील अर्जांबाबत महाधिवक्त्यांचे कायदेशीर मत घेण्यात येणार आहे. तसेच सातारा आणि कोल्हापूर गॅझेटियर लागू करण्याबाबत शासनाने सकारात्मक भूमिका घेतली असल्याचे मंत्री डॉ. सामंत यांनी स्पष्ट केले.मराठा समाजाला न्याय देताना संविधानिक व न्यायिक चौकटीत राहून आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी शासन पूर्णपणे सकारात्मक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील शासन मराठा समाजाला कायदेशीर आणि टिकणारे आरक्षण मिळवून देण्यासाठी कटिबद्ध आहे. त्याचवेळी इतर मागासवर्गीय समाजाच्या आरक्षणाला किंवा त्यांच्या हक्कांना कोणताही धक्का लागू नये, याचीही शासनाकडून पूर्ण दक्षता घेतली जात असल्याचे मंत्री डॉ. सामंत यांनी सांगितले.प्रशासकीय यंत्रणेकडून सुरू असलेली कार्यवाही, उपलब्ध करून देण्यात आलेल्या नोंदी, प्रमाणपत्रांचे वाटप आणि जात पडताळणीची प्रकरणे याबाबतची माहिती संबंधित घटकांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. शासनाची ही कार्यवाही अधिक गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना सातत्याने करण्यात येत असल्याचेही मंत्री डॉ. सामंत यांनी स्पष्ट केले